# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२०

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० / फाल्गुन ५, १९४१ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) गृह मंत्री**<br>**(२) महसूल मंत्री**<br>**(३) पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री**<br>**(४) कृषि, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री**<br>**(५) रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री**<br>**(६) वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६१**

---

### कडकनाथ कोंबडी पालन व्यवसायामध्ये शेतकऱ्यांची झालेली फसवणूक

**(१) * २२०८ श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतीपूरक कडकनाथ कोंबडी पालन व्यवसायातून पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भातील ८ हजाराच्यावर सभासद शेतकऱ्यांची फसवणूक केलेल्या कंपनीच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी पळ काढल्यामुळे

गुंतवणूकदारांची ५०० कोटी रुपयांची रक्कम अडकल्याचे माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर, सांगली व नाशिक जिल्हयातील शेतकऱ्यांना कडकनाथ कोंबडी पालन व्यवसायातून आर्थिक फायदा मिळण्याचे आमिष दाखवत रयत कंपनीने कोट्यवधी रुपयांची फसवणूक केली असल्याचे दिनांक १९ सप्टेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी सांगली, कोल्हापूर व नाशिक जिल्हयातील फसवणूक झालेल्या ३५ शेतकऱ्यांकडून तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत व संबंधित दोषी कंपनीविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) आजपावेतो दाखल गुन्हयांनुसार गुंतवणुकदारांची फसवणूक झालेली रक्कम रु.५०० कोटी इतकी नसून, ती रु.२६,०९,३३,१८३ इतकी आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी आजपावेतो दाखल करण्यात आलेल्या तक्रारीनुसार एकूण १७५८ शेतक-यांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

(४) कडकनाथ कोंबडी पालन फसवणूक संदर्भात महारयत ॲग्रो कंपनी विरुद्ध राज्यात एकुण ११ गुन्हे दाखल असून ४ गुन्ह्यांमध्ये तपासाअंती मा. न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यात आले आहे. उर्वरित ७ गुन्ह्यांचा तपास चालू आहे. तसेच, एम.पी.आय.डी. ॲक्ट १९९९ अन्वये महारयत कंपनीचे संचालकांची ०२ स्थावर मालमत्ता संरक्षित करण्यात आल्या असून, एकुण ७४,४३,८००/- रुपयांची जंगम मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

(५) विलंब झाला नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील इको सेन्सेटिव्ह क्षेत्रात बेकायदेशीर क्रशर मशिनी, सिमेंट व डांबर प्लांट उभारल्याबाबत

**(२) * २२९ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील इको सेन्सेटिव्ह क्षेत्रातील बेकायदेशीर क्रशर मशिनी, सिमेंट व डांबर प्लांटवर माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान कारवाई करण्यात आली परंतु अद्यापपर्यंत त्यांच्या मालकांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कारवाईनंतर बेकायदेशीर क्रशर मशिनी, सिमेंट व डांबर प्लांट सील केले असताना महसूल विभागातील अधिकाऱ्यांच्या सहकार्याने सील तोडून रात्री हे प्लांट चालू ठेवण्यात येत असल्याबाबत स्थानिक नागरिकांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून या क्रशर मशिनी, सिमेंट व डांबर प्लांट उभारणाऱ्या मालकांवर गुन्हे दाखल करण्याबाबत तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१), (२) व (३) भारत सरकार, पर्यावरण, वन व जलवायू मंत्रालयाच्या दि.११/०९/२०१९ रोजीच्या अधिसूचनेनुसार भिवंडी तालुक्यात प्रतिबंधित/ पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात समाविष्ट असणाऱ्या ३७ दगडखाणी, ४३ स्टोन क्रशर व रेडिमिक्स प्लॉंट असे एकूण ८० गौण खनिज विषयक व्यवसाय दि.१०/१०/२०१९ रोजी बंद करण्यात आले आहेत. त्यापैकी एका स्टोन क्रशर मालकाने स्टोन क्रशरचे सील काढून पुन्हा स्टोन क्रशर सुरु केल्याचे निदर्शनास आल्याने संबंधिताविरुध्द पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ मधील कलम १५ व १९ अन्वये भिवंडी तालुका पोलीस ठाणे येथे दि.१५/१०/२०१९ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

क्रशर मशिन, सिमेंट व डांबर प्लाँट सील केले असतांनाही महसूल विभागातील अधिकाऱ्यांच्या सहकार्याने सील तोडून रात्री हे प्लाँट सुरु असल्याबाबत स्थानिक नागरिकांनी जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाकडे तक्रारी प्राप्त झाल्याची बाब दृष्टोत्पत्तीस आली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात महिलांवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ झाल्याबाबत

**(३) * ६१८ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.संजय जगताप (पुरंदर), ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), श्री.राजू कारेमोरे (तुमसर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), डॉ.किरण लहामटे (अकोले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अल्पवयीन मुली व महिलांवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्ये ३३ टक्के वाढ झाली असून दर महिन्याला सरासरी ५३३ महिला अत्याचारांचे गुन्हे नोंदवले जात असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरोने जाहिर केलेल्या आकडेवारीनुसार महिला अत्याचारासंदर्भातील गुन्हयांत मुंबई दुसऱ्या स्थानी व पुणे ४ थ्या स्थानी असल्याचे दिनांक ३० ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महिलांवरील अत्याचाराच्या घटनांना प्रतिबंध बसण्यासाठी आंध्र प्रदेश शासनाप्रमाणे महाराष्ट्रातही "दिशा" कायदा संमत करण्याबाबतची मागणी दिनांक १७ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी निवेदन देऊन केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार महिलांवरील अत्याचाराच्या घटनांना प्रतिबंध बसण्यासाठी आंध्र प्रदेश शासनाप्रमाणे महाराष्ट्रातही "दिशा" कायदा संमत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) गुन्हे अन्वेषन विभाग (सांख्यिकी शाखा), पुणे यांजकडून प्राप्त झालेल्या आकडेवारीनुसार, सन २०१८ मध्ये महिलांवरील लैंगिक अत्याचाराचे १९,९९९ इतके तर सन २०१९ मध्ये २०,०६२ इतक्या गुन्हयांची नोंद झाली असून, सन २०१८ च्या तुलनेत २०१९ मध्ये ०.३१ टक्के इतकी वाढ झाली आहे.
(२) सन २०१८ च्या क्राईम इन इंडीयानुसार मुंबई शहर देशात गुन्हयांच्या संख्येनुसार दुसऱ्या क्रमांकावर व पुणे शहर दहाव्या क्रमांकावर आहे. तथापि, क्राईम रेटनुसार मुंबई देशात नवव्या क्रमांकावर व पुणे शहर दहाव्या क्रमांकावर आहे.
(३) व (४) महिलांवरील अत्याचाराच्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी आंध्र प्रदेश शासनाप्रमाणे महाराष्ट्रातही नविन कायदा तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सावखेडा, कुंभारखेडा व चिनावल (ता.रावेर, जि.जळगांव) येथील सुकी नदी पात्रात अवैध वाळू उपसा होत असल्याबाबत

**(४) * १९२८ श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावखेडा, कुंभारखेडा व चिनावल (ता.रावेर, जि.जळगांव) येथील सुकी नदीच्या पात्रातून संबंधित विभागातील अधिकाऱ्यांच्या सहकार्याने अहोरात्र मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा होत असल्याबाबत दिनांक १० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास ग्रामस्थांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नदीपात्रात अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफिया व अधिकारी यांच्यात आर्थिक हितसंबंध असल्यामुळे या वाळू माफियांवर कारवाई करण्यास संबंधित अधिकारी जाणीवपूर्वक टाळाटाळ करत असल्याची तक्रार नागरिकांनी तालुका व जिल्हा प्रशासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने अवैध वाळू उपसा करणारे वाळू माफिया व संबंधित अधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) अशी बाब दृष्टोत्पत्तीस आली नाही.

(२) व (३) जळगांव जिल्ह्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीला प्रतिबंध घालण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे. सदर पथकामार्फत रावेर तालुक्यात माहे एप्रिल,२०१९ ते जानेवारी,२०२० या कालावधीत गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ४३ प्रकरणी दंडात्मक कार्यवाही करुन रु.३३.५० लक्ष इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजा मोहा (ता.जि.यवतमाळ) येथील भूदान जमिनीची अवैधरीत्या विक्री केल्याबाबत

**(५) * ५४ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा मोहा (ता.जि.यवतमाळ) येथील आचार्य विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीनुसार दान मिळालेल्या जमिनीची नोंद जिल्हा महसूल प्रशासनाच्या रेकॉर्डवरुन नष्ट करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसूल प्रशासनाच्या संगनमताने भूमाफियांनी सदरची १००.८५ हेक्टर जमिन विक्री केल्याची वस्तुस्थिती भूदान यज्ञ मंडळाने माहे डिसेंबर, २०१९ मध्ये उघडकीस आणून याबाबत जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्याकडे तक्रार करुन चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार उक्त जमीन विक्री करणा-या भूमाफियांवर व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करून जमिन परत मिळविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे मोहा, ता व जि.यवतमाळ येथील भूदान जमीन ८७ गटात विभागली गेली असून, गा.न.नं.१ (क) (११) नुसार केवळ ५३ गटांची माहिती त्यामध्ये समाविष्ट असून उर्वरित ३४ गटांची माहिती विसंगत व अपूर्ण असून त्याची चौकशी करण्याबाबत यवतमाळ तहसिल कार्यालयास श्री.नरेंद्र बैस,सदस्य, भुदान यज्ञ मंडळ यांचा तक्रार अर्ज प्राप्त झाला आहे. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने, नायब तहसिलदार (महसूल) (यवतमाळ), मंडळ अधिकारी, यवतमाळ आणि तलाठी (मोहा) यांची चौकशी समिती स्थापित करण्यात आली असून त्यांच्यामार्फत सदर प्रकरणात चौकशी करण्यात येत आहे.

तसेच, श्री.नरेंद्र बैस यांनी तत्कालीन तहसिलदार, यवतमाळ यांचे आदेश दिनांक २८/११/२००३ चे पुनर्विलोकन करण्याबाबत दिनांक १९/११/२०१९ रोजी तहसिल कार्यालय, यवतमाळ येथे अर्ज सादर केला आहे. सदर अर्ज सुनावणीस घेण्यासंदर्भात कायद्यातील तरतूदीनुसार कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील हुतात्मा वीर जगदेवराव सहकारी सूतगिरणी सुरु करण्याबाबत

**(६) * २२७२ श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील हुतात्मा वीर जगदेवराव सहकारी सूतगिरणी मागील १८ महिन्यांपासून बंद असल्याचे दिनांक २० नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सूतगिरणी बंद असल्याने या सूतगिरणीमध्ये काम करणाऱ्या सुमारे ४०० पेक्षा अधिक कामगारांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू सूतगिरणीमध्ये संचालक व प्रशासक मंडळ काळात गैरव्यवहार व चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(५) असल्यास, त्याअनुषंगाने बंद असलेली सूतगिरणी तात्काळ सुरू करून कामगारांना त्यांचे थकित वेतन अदा करण्याबाबत तसेच सूतगिरणी मधील गैरव्यवहार व साहित्य चोरी प्रकरणातील संबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख :** (१) याबाबत कोणतेही लेखी निवेदन अथवा तक्रार प्राप्त झालेली नाही. तथापि, सदर सूतगिरणी ही दिनांक ०१.१०.२०१८ पासून बंद आहे.

(२) या सूतगिरणीकडे आज रोजी जवळपास १२५ कामगार कार्यरत असून इतर कायम कामगारांनी राजीनामा दिलेला आहे.

(३) याबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अंतर्गत गैरव्यवहाराबाबत चौकशी सुरु आहे. तथापि, सूतगिरणीत चोरी झाल्याबाबत कोणतीही तक्रार / माहिती प्रादेशिक उपायुक्त (वस्त्रोद्योग), नागपूर या कार्यालयास प्राप्त नाही.

(४) संचालक मंडळाच्या कालावधीतील गैरव्यवहाराबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८३ अंतर्गत चौकशी पुर्ण करुन अहवालातील गंभीर स्वरुपाच्या मुद्यावर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अंतर्गत चौकशी सुरु आहे. अद्याप चौकशी पूर्ण झालेली नाही.

(५) सदर सूतगिरणीचे थकीत लेखापरिक्षण सन २०१४ ते २०१८ व सन २०१८-१९ या कालावधीचे विशेष लेखापरिक्षक सहकारी संस्था (सूतगिरणी), सांगली या शासकीय लेखापरिक्षकाकडून सुरु आहे. सदर लेखापरिक्षणानंतर आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मच्छिमारांसाठी “मासे उत्पन्न बाजार समिती” स्थापन करण्याबाबत

**(७) * १७१६ श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.चंद्रकांत निंबा पाटील (मुक्ताईनगर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मच्छिमारांना हमी भाव मिळावा आणि कृषि उत्पन्न बाजार समितीप्रमाणे मच्छिमारांसाठी “मासे उत्पन्न बाजार समिती” स्थापन करावी, अशी मागणी राज्याच्या वेस्ट कोस्ट पर्ससीन नेट वेलफेअर असोसिएशनने माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख :** (१) हे खरे नाही, वेस्ट कोस्ट पर्ससीन नेट वेलफेअर असोसिएशन यांच्या मागणीचे निवेदन या विभागास प्राप्त झालेले नाही.

(२) व (३) मत्स्यव्यवसाय, शेती या सदरात मोडत नसल्याने सदर व्यवसायासाठी बाजार समितीचे गठन करण्यात आलेले नाही. तथापी राष्ट्रीय मत्स्य विकास बोर्ड तर्फे उपलब्ध निधीतून महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळामार्फत राज्यात मागणीप्रमाणे ४७ मत्स्यबाजार बांधण्यात आलेले आहेत. मत्स्य विक्रीसाठी मत्स्य बाजार बांधणे असे सध्याचे धोरण आहे.

-----------------

## इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील यंत्रमाग कारखान्यांचे महापुरामुळे झालेले नुकसान

**(८) * ३३७२ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथे माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान हजारो यंत्रमाग कारखाने महापूराच्या पाण्यात आठवडाभर बुडून राहिल्याने उत्पादीत कापड, निर्मितीच्या प्रक्रियेत असलेला कापड, सुताचा साठा, विद्युत यंत्रणा अशा विविध प्रकारे यंत्रमाग धारकांचे सुमारे १२५ कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार नुकसानग्रस्त यंत्रमाग धारकांना मदत करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) तहसिलदार ता.हातकणंगले यांनी सादर केलेल्या अहवालानुसार माहे ऑगस्ट २०१९ मध्ये आलेल्या महापुरामुळे इचलकरंजीमध्ये झालेल्या व्यवसाय नुकसानीचे पंचनामे नियुक्त करणेत आलेल्या पथकाकडुन करण्यात आले असुन प्राप्त पंचनामेनुसार एकुण ३१९ यंत्रमाग कारखान्यांचे नुकसान झाले असुन एकुण नुकसान रक्कम रु.१७,८०,३१,४२३/- इतकी आहे. संबंधीत नुकसानग्रस्तांना शासन निर्णय दिनांक २९ ऑगस्ट, २०१९ नुसार व्यवसाय नुकसानीच्या ७५ टक्के व जास्तीत जास्त रु.५०,०००/- या रक्कमेच्या मर्यादेमध्ये रु.१,५८,१२,७७५/- इतकी रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहरात चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याबाबत

**(९) * ३०३६ श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती मुक्ता टिळक (कसबापेठ), श्री.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरामध्ये दुचाकी चोरीला जाण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली असून गेल्या वर्षभरात शहराच्या वेगवेगळ्या भागातून एक हजार ६६७ दुचाकी चोरी झाल्याचे म्हणजे दिवसाला पाच दुचाकी चोरी जात असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहरात बंद घरे फोडून मौल्यवान वस्तू, दागिने चोरून नेण्याच्या घटनांमध्येही वाढ होत असल्याचे दिनांक १२ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार वाढत्या वाहन चोरी तसेच घरफोडीच्या गुन्ह्यांना प्रतिबंध बसण्यासाठी आवश्यक ती अत्याधुनिक यंत्रणा व मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याबाबत तसेच घडलेल्या गुन्ह्यांचा तपास पूर्ण करून दोषींना शिक्षा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) नाही. पुणे शहर पोलीस कार्यक्षेत्रामध्ये दुचाकी वाहन चोरीच्या गुन्हयांच्या संख्येमध्ये सन २०१८ च्या तुलनेत सन २०१९ मध्ये प्रत्यक्षात घट झाली आहे.

(२) नाही. पुणे शहर पोलीस कार्यक्षेत्रामध्ये घरफोडी चोरीच्या गुन्हयांच्या संख्येमध्ये सन २०१८ च्या तुलनेत सन २०१९ मध्ये प्रत्यक्षात घट झाली आहे.

(३) व (४) वाहनचोरी व घरफोडी चोरीच्या गुन्हयांना प्रतिबंध बसण्यासाठी गुन्हयांचा तपास पूर्ण करुन दोषींना शिक्षा होणेबाबत कोर्ट पैरवी अधिकारी यांची नेमणूक करुन त्यांचेवर नियंत्रण ठेवणेकरीता अभियोग सहायक कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. तसेच सी वॉच अंतर्गत सी सी टी व्ही कॅमेरे बसविलेले असून त्याद्वारे बाधीत क्षेत्रावर नजर ठेवण्यात आलेली आहे. तपास पथक व अधिकारी यांना साध्या वेशात गस्त व ट्रॅप लावण्यात आलेला आहे. घरफोडीचे गुन्हे घडू नयेत म्हणून नागरीकांमध्ये जनजागृती करीत आहोत. कोर्ट पैरवी अधिकारी यांच्या वेळोवेळी आढावा मिटींग घेवून संबंधितांना सूचना देण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे पुरसलगोंदी (ता.एटापल्ली, जि.गडचिरोली) या गावावर नक्षलवाद्यांनी हल्ला केल्याबाबत

**(१०) * ३२२२ ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पुरसलगोंदी (ता.एटापल्ली, जि.गडचिरोली) या गावास दिनांक १ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास नक्षलवाद्यांनी वेढा घालून गावकऱ्यांना जेरबंद केल्याची घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचसुमारास सदर नक्षलवाद्यांनी तेथील गाव पाटील असणाऱ्या मासो या शेतकऱ्यासह कृषी मित्र म्हणून काम करणाऱ्या ऋषी या शेतकऱ्याचीही हत्या केल्याचे दिनांक ३ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार नक्षलवादी चळवळीस प्रतिबंध घालण्यासाठी उपाययोजना करून कायदा व सुव्यवस्था राखण्याबाबत तसेच मृत शेतकऱ्यांच्या वारसास आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) ही बाब खरी नाही.
(२) होय.
(३) पोलीस स्टेशन एटापल्ली येथे गुन्हा नोंद करण्यात आला असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(४) नक्षलवादी चळवळीस प्रतिबंध घालण्यासाठी नक्षल शोध मोहीम तीव्रगतीने राबविण्यात येत आहे. गावकऱ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पुरसलगोंदी भागात नक्षलवादी चळवळी वर प्रतिबंध घालण्याकरिता विशेष अभियान पथक, जलद प्रतिसाद, पोलीस स्टेशन, उप पोलीस स्टेशन, पोलीस मदत केंद्राच्या पथकाद्वारे विशेष अभियान मोहिमेद्वारे उपाययोजना सुरु आहेत.

शासनाच्या वतीने द्यावयाच्या सानुग्रह अनुदान मंजूरीचा प्रस्ताव कार्यवाही अधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डोंगरगाव (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) प्रकल्पालगत कंत्राटदार कंपनी अवैध उत्खनन करत असल्याबाबत

**(११) * २६४६ श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोंगरगाव (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) प्रकल्पालगत कंत्राटदार कंपनी मोठ्या प्रमाणात लाखो रुपयांच्या गौण खनिजांचे अवैध उत्खनन करीत असल्यामुळे परिसरातील नैसर्गिक सौंदर्य नष्ट होत असून भविष्यात डोंगरगाव तलावाची

(प्रकल्पाची) पार फुटून आजुबाजुच्या परिसरातील गावांमध्ये पाणी शिरण्याची भीती निर्माण झाल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या गौण खनिज उत्खननाकडे सबंधित विभागातील अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार अवैध उत्खनन करून शासनाचा लाखो रुपयांच्या महसूलाचे नुकसान करणाऱ्या उक्त कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१), (२), (३) व (४) डोंगरगाव प्रकल्पाचे धरणाचे खालील भागात साठवून ठेवलेल्या ओवरबर्डनमधून दगड व मुरुम उचल व वाहतूक करण्याची संबंधित कंत्राटदार कंपनीस उचित स्वामीत्वधन शासन भरणा केल्यानंतर परवानगी देण्यात आली होती. तथापि, गौण खनिजाची उचल करताना तेथील झाडांचे नुकसान होत असल्याचे निदर्शनास आल्याने कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प, विभाग क्र.१, चंद्रपूर यांनी दि.१५/१/२०२० रोजीच्या पत्रान्वये गौण खनिजाची उचल व वाहतूक करण्यास सदर कंत्राटदार कंपनीस मनाई करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मच्छिमारांच्या डिझेल परताव्याची थकीत रक्कम देण्याबाबत

**(१२) * १६ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.वैभव**

**नाईक (कुडाळ), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.महेंद्र दळवी (अलिबाग), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.महेंद्र थोरवे (कर्जत) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मच्छिमारांना सुरुवातीला डिझेल सबसीडी दिली जात असताना ती बंद करुन त्याऐवजी डिझेल परतावा देण्याचा शासनाने निर्णय घेतला असुन डिझेल परताव्याची रक्कम वेळेवर मच्छिमारांना मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकण किनारपट्टीलगतच्या मच्छिमारांना माहे मार्च, २०१७ पासुनची साधारणतः २० ते २४ महिन्यांच्या डिझेल परताव्याची सुमारे २९३ कोटीची रक्कम मिळाली नसुन रत्नागिरी जिल्हयातील मच्छीमारांचा डिझेल परतावा सुमारे तीन वर्षांपासून प्रलंबित आहे, तसेच रायगड जिल्हयात ४४ मच्छीमार संस्था असून सुमारे २ हजार २२७ यांत्रिक मच्छीमार बोटींचा तब्बल ५० कोटी ६१ लाखांचा डिझेल परतावा थकीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई उपनगरातील वेसावा सहकारी सर्वोदय सोसायटी लिमिटेड व वेसावा मच्छीमार विविध कार्यकारी सोसायटी लिमिटेड या दोन संस्थांना डिझेलवरील मागील २१ महिन्यांचा अंदाजे १९ कोटी रुपयांचा प्रतिपूर्ती परतावा मिळाला नसल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मच्छिमारांना सदरहू थकीत परताव्याची रक्कम वेळेवर देण्यासाठी लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते व विविध संस्थांनी वारंवार शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने डिझेल परताव्याची थकीत रक्कम मच्छिमारांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख :** (१) सन २००५ पुर्वी यांत्रिक मासेमारी नौकांसाठी वित्त विभागाअंतर्गत विक्रीकर विभागामार्फत विक्रीकर मुक्त डिझेल पुरवठा करण्यांत येत होता. त्यानंतर शासन निर्णय दि.१५-०४-२००५ व दि.०३-०९-२००५ अन्वये मच्छीमारांनी मासेमारीसाठी खरेदी केलेल्या डिझेल तेलावरील १०० टक्के विक्रीकर/मुल्यवर्धीत कर योजना लागु करण्यांत आली. डिझेल प्रतिपुर्तीसाठी अर्थसंकल्पित निधीच्या उपलब्धततेनुसार निधी वितरीत करण्यात येतो.

(२) रायगड व रत्नागिरी जिल्हयातील मच्छीमारांना मागील ३ वर्षात डिझेल परताव्यापोटी वर्ष निहाय खालील प्रमाणे निधी वितरीत करण्यांत आलेला आहे.

(रुपये कोटीत)

| वर्ष | रायगड | रत्नागिरी |
|---|---|---|
| २०१७-१८ | १८.८६ | १४.९३ |
| २०१८-१९ | ११.५० | ९.०० |
| २०१९-२० | १८.२५ | १६.३५ |

(३) मुंबई-उपनगर जिल्हयातील वेसावा कोळी सहकारी व वेसावा मच्छीमार विविध कार्यकारी सोसायटी लि. या संस्थांना ३ वर्षात खालीलप्रमाणे निधी वितरीत करण्यांत आलेला आहे.

(रुपये लाखात)

| वर्ष | वेसावा कोळी स.सर्वा.सो.लि | वेसावा मच्छी. वि का. सो. |
|---|---|---|
| २०१७-१८ | ८९.१७ | ५४८.६२ |
| २०१८-१९ | ५१.३९ | ११६.५२ |
| २०१९-२० | ५६.६५ | १७६.३६ |

(४) हे खरे आहे.

(५) सन २०१९-२० करीता रु.६०.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत असून, हिवाळी अधिवेशनामध्ये रु.५०.०० कोटी पुरक मागणीद्वारे मंजूर झालेले आहेत. त्याचप्रमाणे आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात रु.१३७.८५ कोटी इतक्या निधीची पुरवणी मागणीद्वारे मागणी करण्यांत आलेली आहे. डिझेल

प्रतिपूर्तीसाठी मंजूर निधी ज्येष्ठताक्रमाने मच्छिमारांना DBT द्वारे वितरीत करण्याची कार्यवाही जिल्हा स्तरावर सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथे रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या टेकड्या फोडून रस्ता तयार करण्यात येत असल्याबाबत

**(१३) * २९५९ श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहर व उपनगरातील आंबेगाव, धायरी, कात्रज येथे रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या टेकड्या अनधिकृतपणे फोडून टेकडीवर जाण्यासाठी रस्ता तयार करण्यात येत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी तत्कालीन अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी तहसिलदार आणि खनिकर्म विभागाला अहवाल देण्याच्या सूचना केल्या असतांना दोन्ही विभागाकडून अद्यापही अहवाल सादर केला गेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार दोषी व्यक्तींवर व संबधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१), (२), (३) व (४) पुणे शहर तसेच मौजे धायरी येथील टेकड्या अनधिकृतपणे फोडून टेकडीवर जाण्यासाठी रस्ता तयार करण्यात आल्याची बाब दृष्टोत्पत्तीस आली नाही.

मौजे कोळेवाडी, ता.हवेली येथील स.नं.५/२/१/१, ५/२/१/२०/२, ५/२/१/२०/३ व ५/२/१/२२ या जमिनीतून ९१४ ब्रास गौण खनिजाचे अवैध उत्खनन तसेच स.नं.५/२/१/२३ या जमिनीतून ९०९२ ब्रास गौण खनिजाचे अवैध उत्खनन केल्याप्रकरणी संबंधितांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम,१९६६ चे कलम ४८(७) नुसार नोटीसा बजावण्यात आल्या असून त्यानुसार दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित आहे.

तसेच मौजे कात्रज, ता.हवेली येथील स.नं.६२/१ व ६२/३ या जमिनीतून गौण खनिजाचे अवैध उत्खनन केल्याप्रकरणी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४८(७) नुसार अनुक्रमे रु.६८,०४,५८४/-, रु.३५,०४,३८४/- व रु.१८,०६,३७६/- इतक्या दंडात्मक रक्कमेचे आदेश संबंधितांना बजावण्यात आले असून संबंधितांच्या मिळकतीवर (गाव न.नं.७/१२) वर बोजा चढविण्यात आला आहे. सदर दंडात्मक रक्कम वसूलीची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम मिळण्याबाबत

**(१४) * १०१ डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.फारूक शाह (धुळे शहर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली), ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी**

**(दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.राम सातपुते (माळशिरस), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.टेकचंद सावरकर (कामठी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सदा सरवणकर (माहिम), डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.महेंद्र थोरवे (कर्जत), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), ॲड.शहाजीबापू पाटील (सांगोले), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.राजु पारवे (उमरेड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे सुमारे ९६ ते ९८ टक्के नुकसान झालेले असतानाही नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना गत वर्षाच्या विम्याची रक्कम मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र व राज्यशासन तसेच पीक विमाधारक शेतकरी यांनी ‘पीक विमा’ रक्कम भरलेली असतानाही पीक विमा कंपन्यांनी राज्यातील ९० लाख नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अपात्र ठरविले असल्याचे दिनांक २४ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील ४६ टक्के शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पीक विमा योजनेतंर्गत उत्पादन खर्चाच्या तुलनेत मिळणारी नुकसान भरपाई १० टक्के इतकीच म्हणजे झालेल्या नुकसानीच्या तुलनेत कमी मिळत असल्याची माहिती पुणे येथील द युनिक फाऊंडेशन या संशोधन संस्थेने केलेल्या

सर्व्हेक्षणात निदर्शनास आले असून नुकसान भरपाई देण्याचा दर ९० टक्के केल्यास शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळेल असे द युनिक फाऊंडेशनच्या अहवालामध्ये नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शेतकऱ्यांना पीक विमा कंपन्यांकडून पिकांच्या नुकसानीची भरपाई योग्य प्रमाणात मिळत नसुन विमा कंपन्यांचा जास्तीत जास्त फायदा होत असल्याने, शेतकऱ्यांना अधिकचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री पीक विमा योजनेत आवश्यक त्या सुधारणा सुचविण्यासाठी समिती नेमली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, त्याअनुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम देण्यासह पीक विमा योजनेसाठी सुचविण्यात आलेल्या समितीच्या सुधारणांचा प्रस्ताव केंद्र सरकारला सादर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

खरीप हंगाम २०१९ मध्ये राज्यामधील शेतकऱ्यांनी एकूण १२६.४८ लक्ष अर्ज सादर केले असून रुपये ५७८.८५ कोटी विमा हप्ता भरून ६७.३३ लक्ष हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित केले आहे.

ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१९ मध्ये झालेल्या अवेळी / चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसान भरपाईचे बाधित क्षेत्र जास्त असल्यामुळे यासंदर्भात नुकसानीची परिगणना करण्याचे काम विमा कंपनीमार्फत अंतीम टप्प्यात आहे.
(३) द युनिक फाऊंडेशन या संशोधन संस्थेचा अहवाल शासनास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही
(४) हे अंशत: खरे आहे.

पिक विमा योजनेत सुधारणा सुचविण्यासाठी मंत्रीमंडळाची उपसमिती गठीत केली आहे.

(५) सदर समितीची कार्यवाही प्रगतिपथावर आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पेण (जि.रायगड) तालुक्यात अवकाळी पाऊस व पुरामुळे शेत तलावासह मत्स्यशेतीचे झालेले नुकसान

**(१५) * २७६ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेंद्र दळवी (अलिबाग), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) तालुक्यात अवकाळी पाऊस व पुरामुळे शेतक-यांच्या शेत तलावसह मत्स्यशेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुरामुळे शेत तलावाचे बांध फुटुन तलावात वाहून आलेल्या गाळामुळे शेतकऱ्यांचे उदरनिर्वाहाचे साधन नष्ट झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतक-यांच्या मत्स्यशेतीच्या नुकसानीचे पंचनामे होवूनही बाधीत शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत नुकसान भरपाई मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून नुकसानग्रस्त शेतक-यांना तातडीने नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख :** (१) अंशतः खरे आहे.

(२) शेतकऱ्यांच्या शेत तलावांवरून पाणी वाहिल्यामुळे शेत तलावातील मत्स्यसाठा व मत्स्यबीज वाहून गेल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.

(३) शेतकऱ्यांच्या शेत तलावांचे पंचनामे करण्यात आले आहेत. नुकसान भरपाईकरिता प्रस्ताव जिल्हा प्रशासनाकडे पाठविण्यात आला आहे.

(४) सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय, रायगड यांनी दि.२१.१२.२०१९ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी रायगड यांचेकडे रु.२९.९५ लक्ष निधीचा नुकसान भरपाई प्रस्ताव सादर केला आहे.
(५) दि. २१.१२.२०१९ रोजीच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने नुकसान भरपाईची रक्कम प्राप्त होताच शेतकऱ्यांना वाटप करण्यात येईल.

-----------------

## पंढरपूर ते आळंदी कार्तिकवारी करणाऱ्या वारकऱ्यांच्या दिंडीला झालेला अपघात

**(१६) * १२७७ श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.महेंद्र दळवी (अलिबाग), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर ते आळंदी कार्तिकवारी करणाऱ्या वारकऱ्यांच्या दिंडित दिनांक १९ नोव्हेंबर, २०१९ रोजी सासवडजवळील दिवे घाटात जेसीबी घुसल्यामुळे झालेल्या अपघातात संत नामदेव महाराजांचे १७ वे वंशज सोपान महाराज तुळशीदास रामदास आणि अतुल महाराज अळशी यांचा जागीच मृत्यू होऊन एकूण १६ वारकरी गंभीर जखमी झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अपघाताची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मृत्यू पावलेल्या व्यक्तिच्या कुटुंबियांना व जखमींना शासनाने कोणत्या प्रकारची मदत केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) पंढरपूर ते आळंदी कार्तिकवारी करणाऱ्या वारकऱ्यांच्या दिंडीला सासवडजवळील दिवे घाटात दिनांक १९ नोव्हेंबर २०१९ रोजी जेसीबी वाहनाचा ब्रेक निकामी होऊन झालेल्या अपघातात एकूण २ वारकरी मयत, २ गंभीर जखमी व इतर २२ वारकरी किरकोळ जखमी झाले होते.

मृतामध्ये श्री.सोपान तुळशीदास रामदास व श्री.अतुल अळशी यांचा समावेश आहे.

(२) व (३) जे.सी.बी.चालक श्री.निरंजनकुमार दास यांनी जे.सी.बी वाहन बेजबाबदारपणे व भरधाव वेगाने चालविल्याने सदर अपघात झाला आहे. सदर दुर्घटनेबाबत लोणी काळभोर पोलिस स्टेशनमध्ये गु.र.नं.७९८/२०१९ भा.दं.वि. कलम ३०४, ३३७, ३३८ नुसार दि.१९.११.२०१९ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जे.सी.बी चालकास अटक करण्यात आली आहे.

पोलिसांकडून गुन्हयाचा तपास पुर्ण करून दि.१६.०१.२०२० रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

सदर अपघातात मृत झालेल्या दोन व्यक्तींच्या वारसांना तसेच दोन गंभीर जखमी झालेल्या व्यक्तींना आर्थिक मदत देण्याच्या अंनुषंगाने संबधित जिल्हाधिकारी अकोला, सोलापूर व बुलडाणा यांच्याकडून अनुक्रमे दि.१२.०२.२०२० व १४.०२.२०२० अन्वये मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयातील नदीपात्रातून अवैधरित्या रेती उत्खनन होत असल्याबाबत

**(१७) * २४९१ श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.नामेदव ससाने (उमरखेड), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील राळेगाव, कळंब, उमरखेड, महागाव, पुसद, झरीजामणी या तालुक्यांसह आर्णी तालुक्यातील पैनगंगा व अरुणावती नदी पात्रातून, बाभुळगांव तालुक्यातील बेंबळा व इतर नदीपात्रातून तसेच मारेगाव तालुक्यातील वर्धा नदीपात्रातून अवैधरीत्या वाळूचा दररोज उपसा केला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येवती, खैरी, वा-हा, सोईट (ता.राळेगांव, जि.यवतमाळ) येथील लिलाव न झालेल्या रेती घाटावरून अवैधरित्या रेतीचे उत्खन्नन होत असून

आष्टा येथील उत्खननांमुळे नदीमध्ये खडडे पडले असल्याचे तसेच भैयापुर नांदेसावंगी नागरगांव (ता.बाभुळगांव, जि.यवतमाळ) या रेती घाटावरून अवैध उत्खनन करून टॅक्टर व ट्रकव्दारे वाहतुक होत असल्याने नांदेसावंगी ते वेणी या रस्त्याची दुरवस्था झाली आहे तसेच यवतमाळ जिल्हयातील नदीपात्रातील एकुण १९ रेतीघाटांचा अधिकृत लिलाव झालेला नसतानाही सदर रेती घाटातून दररोज रेतीचा उपसा करुन ट्रकने वाहतूक केली जात असून यवतमाळ-नागपूर मार्गावरील मडकोना, जांब चौफुली, मादणी या ठिकाणावरुनही रेतीची अवैध वाहतूक होत असून जेसाबीच्या सहाय्याने मुरूम काढून मोठया प्रमाणात गौण खनिजाची तस्करी करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रेती उत्खनन नियंत्रणासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेत पोलीस अधिक्षक, परिवहन अधिकारी, जिल्हा खनिकर्म अधिकारी यांची समिती गठीत केली असतानाही रेती तस्करांच्या विरोधात कारवाई होत नसल्याने अधिनस्थ यंत्रणा या समितीला खोटा अहवाल पुरवत असल्याचा संशय बळावत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रेती उपसा बंदीच्या काळातही शहराच्या चहूबाजूंनी रेतीचे ढिगारे लागले असून स्थानिक यंत्रणेला माहिती असूनही याविरुद्ध कुठलीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत चौकशी करून दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१), (२), (३), (४) व (५) राळेगाव तालुक्यातील आष्टा, रोहिणी, हिरापूर येथील रेतीघाटावर जाणारा रस्ता वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्यासाठी खोदून काढण्यात आलेला आहे. राळेगांव तालुक्यात सन २०१९-२० मध्ये वाळूच्या अवैध वाहतूकीच्या २४ प्रकरणी दंडात्मक कार्यवाही करुन रु.२१.१५ लक्ष इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे. बाभूळगाव तालुक्यात वाळूच्या अवैध वाहतूकीच्या २९ प्रकरणी दंडात्मक कार्यवाही करुन रु.२१,६७,८००/- इतकी रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. तर ३ प्रकरणात वाहनधारकांनी दंडाची रक्कम न भरल्याने संबंधितांच्या स्थावर मालमत्तेवर बोजा चढविलेला आहे. यवतमाळ-

नागपूर मार्गावरील मडकोना, जांब चौफुली, मादणी या ठिकाणी ९५९.९३ ब्रास रेतीची अवैध साठवणूक प्रकरणी संबंधितांविरुध्द जप्तीची तसेच फौजदारी कार्यवाही करण्यात आली आहे. यवतमाळ जिल्हयात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पोलीस अधीक्षक, परिवहन अधिकारी, जिल्हा खनिकर्म अधिकारी यांची दि.१९/१२/२०१५ रोजी समिती गठीत करण्यात आली आहे. त्यानुसार परिवहन विभागामार्फत सन २०१९-२० मध्ये केलेल्या तपासणीत ५ वाहने अधिभाराची आढळून आल्याने संबंधितांकडून रु.१,७७,३५२/- इतके अधिभार शुल्क वसूल करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४८(७) नुसार रु.२,२७,०००/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

यवतमाळ शहराच्या आजूबाजूने आढळून आलेल्या ६ वाळूचे अवैध साठ्याप्रकरणी जप्तीची कार्यवाही करुन संबंधितांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहे. तसेच वाळूच्या अवैध वाहतूकीच्या २७ प्रकरणी रु.५६.८७ लक्ष इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली आहे. तर ३ प्रकरणी रक्कम वसूलीची कार्यवाही सुरु आहे.

यवतमाळ जिल्हयात माहे एप्रिल, २०१९ ते डिसेंबर, २०१९ या कालावधीत गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या २९८ प्रकरणी रु.४,५९,६६,६१३/- इतका दंड आकारण्यात आला असून त्यापैकी रु.२,१४,८७,११८/- इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली आहे. तर ३० प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले असून ४३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## बुलढाणा जिल्हयात समृध्दी महामार्गाच्या कामासाठी अवैध गौण खनिज उत्खनन होत असल्याबाबत

**(१८) * १३९२ श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील समृध्दी महामार्गाच्या कामासाठी लगतच्या परिसरातील गौण खनिजाचे उत्खनन करुन वापर करण्यास परवानगी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बहुतांश ठिकाणी परवानगी नसतांना गौण खनिजाचे उत्खनन झाले असून अशा प्रकरणातील संबंधितांवर कारवाई करण्याचे निर्देश केंद्रीय ग्रामविकास समितीचे अध्यक्ष यांनी माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या निर्देशानुसार चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) हे खरे आहे.
(२) अशी बाब दृष्टोत्पत्तीस आली नाही.
(३) व (४) मौजे डोणगाव, ता.मेहकर जि.बुलडाणा येथील भाग-३, स.नं.३५६/२ व भाग-१ मधील स.नं.२६८ मधून विना परवानगी गौण खनिजाचे उत्खनन झाल्याची तक्रार तसेच स्थानिक वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाल्याच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली होती. त्यानुषंगाने केलेल्या चौकशीत मौजे डोणगाव येथील भाग-३ मधील स.नं.३५६/२ मधून ६६९०० ब्रास व भाग-१ मधील स.नं.२६८ मधून ४९३७ ब्रास गौण खनिजाचे अवैध उत्खनन केल्याप्रकरणी तहसिलदार, मेहकर यांनी अनुक्रमे रु.३६,१३,२६,९००/- व रु.२,५६,६४,७३७/- इतक्या दंडात्मक रक्कमेचे आदेश पारित केले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पाली (ता.सुधागड, जि.रायगड) येथील क्रिडा संकुल सुरु करण्याबाबत

**(१९) * २०९३ श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाली (ता.सुधागड, जि.रायगड) येथे खेळांसाठी प्राधान्य देण्यासाठी ३ वर्षापुर्वी बांधलेल्या क्रिडा संकुलाचे उद्घाटन न झाल्यामुळे क्रिडा संकुल विनावापर पडून आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाखो रूपये खर्च करून बांधण्यात आलेल्या क्रिडासंकुलाचे उद्घाटन न झाल्याने क्रिडा संकुलाचा वापर होत नसुन खेळाडू व क्रिडाप्रेमींना त्याचा लाभ घेता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामीण क्रिडा क्षेत्रातील खेळाडूंना उत्तेजन मिळण्यासाठी सदरहू क्रिडा संकुलाचे उद्घाटन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) सदर तालुका क्रीडा संकुलाचे काम अंतीम टप्प्यात असून संकुलाचे काम पूर्ण झाल्यावर उद्घाटन करण्याचे प्रयोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे कांजूर (मुंबई) येथील भुखंडाची अवैधरित्या विक्री केल्याबाबत

**(२०) * ५२७ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडूप (प) (मुंबई) सह्याद्री नगर मौजे कांजूर सर्व्हे नं.१०५ (हि.नं.३) न.भू.क्र.२३७ मधील ९३६५.५० चौ.मी क्षेत्राची सिद्धिविनायक सोसायटीचे प्रवर्तक शशिकांत साळवी यांचेसह २४ सदस्यांनी ८७७.९१ चौ.मी. क्षेत्राचे दस्ताऐवज क्रमांक पी.बबज/४४०६/९० अन्वये दिनांक ६ ऑक्टोबर, १९९० रोजी खरेदी केली असून उर्वरित क्षेत्र १० सोसायट्यांनी भूखंडाचे मयत मूळ मालक इसुफ कबीर बगदादी यांचेकडून अधिकृतरित्या खरेदी केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मिळकत महम्मद अली इसुफ बगदादी व इतर सहा मुळ मालकाच्या वारसदारांनी दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१० रोजी कन्व्हेन्स डीडद्वारे पुनश्चः मे.आकार निर्माण प्रॉपर्टीज कंपनीला बेकायदा विक्री करुन या ११ सोसायटीतील २३५ कुटुंबाना बेघर केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मिळकत श्री.साळवी यांच्यासह ११ सोसायट्यांनी अधिकृत खरेदी केलेली असतानाही जिल्हाधिकारी, मुंबई यांनी सोसायट्यांचे भूखंड दस्तऐवज नोंदणी इंडेक्स-२ इत्यादी कागदपत्रांची पाहणी न करताच दिनांक २८ मे, २०१८ रोजी सदरहू मिळकतीच्या मालमत्ता प्रमाणपत्रावर मे.आकार निर्माण प्रॉपर्टीज या कंपनीचे नांव दाखल केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार सदरचा बेकायदा जमीन खरेदी/विक्री हस्तांतरण व्यवहार तात्काळ रद्द करुन उक्त भूखंड ११ सोसायटीमधील २३५ रहिवाशांना घरे बांधण्यासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) मौजे कांजूर येथील स.नं. १०५ (हि.नं.३) चे गांव अभिलेख गाव नमुना नं.७/१२ व फेरफार तपासले असता अशी नोंद आढळून आलेली नाही.

(२) मौजे-कांजुर येथील स.नं. १०५ (हि.नं.३) चे गाव अभिलेख पाहता, फेरफार क्र.९६३, दि.२५/४/२०११ अन्वये इसुफ कबीर बगदादी यांच्या वारसांकडून खरेदी केलेल्या नोंदणीकृत खरेदी खताने २ एकर, ३ गुंठे क्षेत्रावर मे.आकार निर्माण प्रॉपर्टीज यांचे नाव दाखल करण्यात आलेले आहे.

(३), (४) व (५) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांच्याकडील दि.२८/०५/२०१८ च्या बिनशेती सनद तसेच सर्वे नं. १०५, हि.नं.३ चे गाव नमुना नं.७/१२ वरील दाखल धारक या आधारे न.भू.क्र.२३७ च्या मिळकत पत्रिकेवर दि.१०/०१/२०१९ रोजीच्या नोंदीने धारक सदरी नगर भूमापन अधिकारी, मुलुंड यांनी ८३९७.१५ चौ.मी. क्षेत्रावर आकार निर्माण प्रॉपर्टीज यांचे नाव दाखल केलेले आहे.

सिध्दीविनायक सोसायटीचे प्रवर्तक शशिकांत साळवी व २४ सदस्य यांनी ८७७.९१ चौ.मी. क्षेत्र सन १९९० मध्ये नोंदणीकृत दस्ताद्वारे खरेदी केल्याचा दावा केला आहे. तथापि, सदरच्या दस्ताची नोंद गाव अभिलेखाच्या गाव नमुना नं.७/१२ सदरी घेतल्याचे दिसून येत नाही. श्री. साळवी यांनी सन १९९० मध्ये नोंदणीकृत दस्ताद्वारे क्षेत्र खरेदी केले असल्यास, त्यांनी त्याचवेळी गाव नमुना नं.७/१२ सदरी नोंद घेण्यासाठी तलाठी यांचेकडे अर्ज सादर करणे गरजेचे होते.

तथापि, आजमितीस देखील सिध्दीविनायक सोसायटीचे प्रवर्तक श्री.साळवी यांच्याकडे नोंदणीकृत दस्त उपलब्ध असल्यास, त्याची नोंद गाव नमुना नं.७/१२ सदरी घेण्याकरीता त्यांनी सक्षम न्यायालयात दाद मागणे गरजेचे आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात पोलिसांसाठी विशेष गृहनिर्माण धोरण तयार करण्याबाबत

**(२१) * १८२ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.महेंद्र दळवी (अलिबाग), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलीसांच्या वास्तव्यासाठी घरे उपलब्ध व्हावीत यासाठी विशेष गृहनिर्माण धोरण तयार करण्याची घोषणा राज्याचे मा.नगरविकास व गृहमंत्री यांनी दिनांक ३० डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (वडाळा) यांनी मा.मुख्यमंत्री यांना पत्र दिले असून धोरण निश्चित करण्यासाठी राज्याचे पोलीस महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती स्थापन करण्याचे निर्देश मा.गृहमंत्री यांनी दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर धोरण निश्चित करून तातडीने अंमलात आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१), (२) व (३) राज्यातील पोलीस ठाणी व पोलीस वसाहती यांमधील सुविधांबाबत मा.गृह मंत्री, महाराष्ट्र शासन, यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३०.१२.२०१९ रोजी एक बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत मा. गृह मंत्री यांनी पोलीस महासंचालक, म.रा., आणि पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांना पुढीलप्रमाणे निदेश दिले :-

I. सध्याच्या पोलीस सेवा निवासस्थानांच्या आढावा घ्यावा आणि आणखी किती सेवा निवासस्थानांची गरज आहे ते ठरवावे.

II. दुरुस्तीच्या पलिकडे असलेल्या सेवा निवासस्थानांचा पुनर्विकास व नवीन सेवा निवासस्थानांचे बांधकाम ही कामे सिडको व म्हाडा यांसारख्या शासकीय संस्था आणि खाजगी विकासक यांच्यामार्फत अथवा त्यांच्याशी भागीदारीने करण्याबाबत धोरण ठरवण्यासाठी सुसाध्यता अभ्यास करुन शासनास अहवाल सादर करावा.

वरील निदेशांनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## एस.जे.एस.व्ही. आणि श्रीराम समर्थ सोसायटी या कंपन्यांनी गुंतवणुकदारांची केलेली आर्थिक फसवणूक

**(२२) * २७९५ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एस.जे.एस.व्ही. लॅन्ड डेव्हलपर्स इंडिया लि. व श्रीराम समर्थ सोसायटी प्रा.लि. यांनी गुंतवणूकदारांची आर्थिक फसवणूक केल्याबाबतची तक्रार विधानसभा सदस्य, बल्लारपूर यांनी पोलिस अधिक्षक, चंद्रपूर यांच्याकडे दिनांक ३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन देऊन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) i) दिनांक २४/११/२०१७ रोजी श्री. सुनिल नामदेवराव नैताम यांचे लेखी रिपोर्ट वरुन एस.जे.एस.व्ही कंपनीच्या १४ संचालकांविरुध्द गुंतवणुकदारांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी पोलीस स्टेशन, चंद्रपूर शहर येथे अप क्र. १५६०/१७ कलम ४०६, ४०९, ४२०, ३४ भादंवि सहकलम ३ एम.पी.आय.डी. ॲक्ट १९९९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीस दिनांक १०.१२.२०१९ रोजी अटक केली आहे.

ii) दिनांक १६/१२/२०१९ रोजी श्री. सुभाष दत्ताजी शिरटकर यांचे लेखी रिपोर्टवरुन श्रीराम समर्थ मल्टीस्टेट ॲग्रो को-ऑप सोसायटी लि. कंपनीच्या संचालकांविरुध्द गुंतवणुकदारांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी पोलीस स्टेशन, चंद्रपूर शहर येथे अप क्र. १०१२/१९ कलम ४०६, ४०९, ४२०, १२० (बी) भादंवि सहकलम ३ एम.पी.आय.डी. ॲक्ट १९९९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. दोन आरोपींस दिनांक १६.१२.२०१९ रोजी व तीसऱ्या आरोपीस दिनांक २१.१२.२०१९ रोजी अटक केली आहे.

दोन्ही गुन्ह्यांचा तपास आर्थिक गुन्हे शाखा चंद्रपूर करीत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुक्ताईनगर (जि.जळगांव) मतदार क्षेत्रात केळी संशोधन केंद्र उभारण्याबाबत

**(२३) * ३१७३ श्री.चंद्रकांत निंबा पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर (जि.जळगांव) मतदार क्षेत्रात मुक्ताईनगर, रावेर व बोदवड या तीन तालुक्यात जवळपास ९० ते १०० गावे ही फळ बागायती असून त्यात केळी पिकांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असुन याठिकाणी केळी संशोधन केंद्र नसल्यामुळे शेतकऱ्यांना केळी पिकावर येणाऱ्या रोगांचे संशोधन करता येत नसल्याने केळी उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुक्ताईनगर मतदार क्षेत्रात केळी तसेच शेतमाल प्रक्रिया केंद्र उभारण्याबाबत शेतकऱ्यांनी वारंवार शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतमाल प्रक्रिया केंद्र उभारल्यास तेथील सुशिक्षित बेरोजगारांना शेतमालावर आधारित छोटे-मोठे उद्योगधंदे उभारता येतील, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या अनुषंगाने शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरूप काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) नाही, हे खरे नाही. तथापि केळी पिकावर येणाऱ्या रोग व किडींचे संशोधन करण्याकरीता महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत जळगाव येथे केळी संशोधन केंद्र कार्यरत आहे.

(२), (३) व (४) नाही.

सन २०१७-१८ या वर्षापासुन शासनाने “मा. मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजना” सुरु केली आहे. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांकडून अर्ज प्राप्त झाल्यास प्रक्रिया प्रकल्प, बांधकाम व मशिनरी खरेदीच्या ३० टक्के जास्तीत जास्त रक्कम रु. ५०.०० लाख यापैकी जे कमी असेल ती रक्कम अनुदान म्हणून देय आहे.

(५) संबंधित नाही.

-----------------

## दरी मातोरी (ता.जि.नाशिक) येथील फार्म हाऊसवर मागास वर्गीय व्यक्तींवर लैंगिक अत्याचार केल्याबाबत

**(२४) * ३४ श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दरी मातोरी (ता.जि.नाशिक) येथील शिवगंगा फार्म हाऊसवर मागास वर्गीय व्यक्तींवर लैंगिक अत्याचार करून नग्नावस्थेतील फोटो व इतर माहिती फेसबुक व व्हाट्सअॅपवर प्रसिद्ध करणाऱ्या व्यक्तींवर दखलपात्र गुन्हे दाखल करण्याची मागणी दिनांक १५ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण व पोलिस आयुक्त, नाशिक यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी गुन्हा दाखल करण्यास पोलिसांना दोन दिवस लागल्यामुळे गुन्हा दाखल न करण्यास कुणाचा दबाव होता याबाबत चौकशीची मागणी होत असून गुन्ह्यातील आरोपी अद्यापही फरार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून गरीब व मागासवर्गीय फिर्यादी यांची माहिती सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रसिद्ध करणाऱ्या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर प्रकरणी फोटो व इतर माहिती फेसबुक व व्हाट्सअॅपवर प्रसिध्द करणाऱ्या व्यक्तीवर दखलपात्र गुन्हे दाखल करण्याची मागणी केली नसुन सदर प्रकरणातील आरोपींना कठोर शासन करण्याबाबत निवेदन प्राप्त झाले आहेत.

(२) व (३) सदर प्रकरणी नाशिक तालुका पोलीस ठाणे येथे भा.दं.वि.सं. कलम ३०७, ३७७, ३४१, २९४, १४३, १४७, १४९, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह अनुसूचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंध) सुधारणा कायदा, २०१५ कलम ३ (१) (ई), ३ (२)(५) सह भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५ अन्वये गु.र.क्र. ०५/२०२० दाखल करण्यात आला असून, ११ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

तसेच एका आरोपीचा शोध घेण्यात येत असून, सदर गुन्हा सद्य:स्थितीत पोलीस तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्हयात अवैधरित्या वाळूची तस्करी होत असल्याबाबत

**(२५) * २४२ श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयातील नदी नाल्यातून तसेच लिलाव न झालेल्या वाळू घाटातुन महसूल विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने अवैधरीत्या वाळूची तस्करी होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वाळू तस्करीमुळे शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या महसुलाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून वाळू तस्करांवर व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) अशी बाब दृष्टोत्पत्तीस आली नाही.
(२) व (३) भंडारा जिल्ह्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीला प्रतिबंध घालण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर भरारी पथकांची तसेच चेकपोस्टवर बैठे पथकाची स्थापना करण्यात आली आहे. सदर पथकांमार्फत भंडारा जिल्ह्यात माहे एप्रिल,२०१९ ते डिसेंबर,२०१९ या कालावधीत गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीच्या २०८ प्रकरणी रु.३,०४,६६,८५९/- इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली आहे. गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांविरुध्द ४७ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उत्तर सोलापूर (जि.सोलापूर) तालुक्यातील शेतकऱ्यांना कांद्याच्या सदोष बियाण्यांची विक्री केल्याबाबत

**(२६) * ४०३८ श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उत्तर सोलापूर (जि.सोलापूर) तालुक्यातील सुमारे १५० पेक्षा जास्त शेतकऱ्यांना सदोष कांद्याच्या बियाण्यांची विक्री करून त्यांची फसवणूक करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्री.गुरुराज माऊली कृषी केंद्र या दुकानातुन मार्शल ब्रांड असणारे कांद्याचे बियाणे जवळपास १४७ शेतकऱ्यांनी विकत घेतले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू बियाण्यांची लागवड करूनही कांद्याचे पिक आले नसल्याने नुकसान झाल्याचा अहवाल कृषी सहाय्यक यांनी वरिष्ठांना सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार शेतकऱ्यांना सदोष कांद्याच्या बियाण्यांची विक्री करणाऱ्या संबंधितांवर कारवाई तसेच नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) उत्तर सोलापूर तालुक्यातील ९ शेतकऱ्यांनी कांदा पिकाची वाढ न झाल्याची तक्रार केली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने तालुका तक्रार निवारण समितीने शेतकऱ्यांच्या क्षेत्रातील कांदा पिकाची तपासणी केली होती. सततच्या पावसामुळे जमिनीमध्ये ओलावा राहिल्याने कांदा पिकाच्या गड्ड्याची वाढ झालेली नाही तसेच कांदा पिकावर करपारोग पडल्याने पाने करपलेली दिसून आली. त्यामुळे शेतकऱ्यांच्या कांदा पिकाचे नुकसान झालेले असल्याचे समितीने आपल्या अहवालात नमूद केले आहे.

(४) कांदा बियाणे सदोष असल्याबाबतची बाब निदर्शनास आलेली नाही. अवेळी पावसामुळे नुकसान झालेल्या ९ कांदा उत्पादक शेतकऱ्यांना रु.८०००/- प्रती हेक्टर प्रमाणे मदत देण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## साखरीआगर (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील मच्छिमारांच्या जेटीचे बांधकाम पुर्ण करण्याबाबत

**(२७) * ११२१ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साखरीआगर (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथे राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत सन २०१२-१३ मध्ये सुरू झालेले मच्छिमार जेटीचे काम मागील ५ वर्षांपासून अर्धवट स्थितीत असल्याने या भागातील मच्छिमारांना आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जेटीचे बांधकाम पुर्ण करण्यासाठी दिनांक २४ जून, २०१९ रोजी वा त्यासुमारास मा.मत्स्यव्यवसाय विकास मंत्री यांच्या उपस्थितीत बैठक होऊन निधीची उपलब्धता असुन तात्काळ काम सुरु करण्याचे आदेश मा.मंत्री महोदय यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बैठकीत झालेला निर्णय व आदेशांच्या अनुषंगाने जेटीचे बांधकाम पुर्ण करण्याबाबत व सदरहू कामास विलंब करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख :** (१) हे खरे आहे. मात्र सदर काम राष्ट्रीय कृषि विकास योजनेतर्गत मंजूर आहे.
(२) व (३) बाबत तत्कालीन मा.मंत्री (पदुम) यांनी दिनांक २४.६.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये पर्यावरण विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून काम त्वरीत सुरु करण्याचे निदेशित केले होते. उक्त निर्देशास अनुसरुन पत्तन अभियंता रत्नागिरी यांनी सल्लागारामार्फत पर्यावरण आघात अहवाल तयार करून महाराष्ट्र सागरी नियमन क्षेत्र प्राधिकरणाकडे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी दि. २४/०१/२०२० रोजी प्रस्ताव सादर केला आहे. पर्यावरण विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त होताच प्रत्यक्ष कामास सुरुवात होईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नेवाळी, कल्याण (जि.ठाणे) येथील आंदोलनादरम्यान आंदोलकांवर दाखल झालेले गुन्हे मागे घेण्याबाबत

**(२८) * १४९४ श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आरे (मुंबई) मेट्रो कारशेडच्या जागेवरील वृक्षतोडी विरोधात निदर्शने करणाऱ्या आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्यात आले त्याचप्रमाणे नेवाळी, कल्याण (जि.ठाणे) येथील आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांना दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने नेवाळी येथील आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) होय.

(२) नेवाळी, कल्याण (जि.ठाणे) येथे झालेल्या आंदोलना दरम्यान हिललाईन पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. १७०/२०१७, गु.र.क्र. १७१/२०१७, गु.र.क्र. १७२/२०१७ व मानपाडा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३५९/२०१७ असे एकूण चार गुन्हे दाखल आहेत. सदर प्रकरणी खटले मागे घेण्याच्या अनुषंगाने पोलीस आयुक्त, ठाणे यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे. अहवाल प्राप्त होताच शासन स्तरावर उचित कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना पुर्ववत सुरु करण्याबाबत

**(२९) * ३९६२ श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलिसांच्या उपचारासाठी राज्य शासनाच्या महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजने अंतर्गत खाजगी रुग्णालयांचे परतावे न मिळाल्याने या रुग्णालयांनी पोलिसांना या योजनेतून उपचार देणे बंद केल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील मोठ्या खाजगी रुग्णालयांनी पोलिसांना उपचार देणे बंद केल्यामुळे त्यांना गुणवत्तापूर्ण उपचारापासून वंचित राहावे लागत असून ग्रामीण भागातील रुग्णालयात जाऊन उपचार घ्यावे लागत असल्याने सदर योजना पूर्ववत सुरु करण्याबाबत पोलिसांकडून मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीनुसार रुग्णालयाचे परतावे तातडीने देऊन सदर योजना पूर्ववत सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) व (२) हे खरे नाही. महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेच्या पॅनेलवरील रुग्णालयांनी पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना उपचार देणे बंद केले, असे निदर्शनास आले नाही. उक्त योजनेच्या प्रयोजनाकरिता पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या मागणीनुसार अनुदान खर्च करण्यास वेळोवेळी मंजुरी देण्यात आली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नरडुवे (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) परिसरातील गड नदीपात्रात अवैध उत्खनन होत असल्याबाबत

**(३०) * ७९० श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नरडुवे (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) परिसरातील गड नदीपात्रात गत १ वर्षापासून वाळू माफिया रात्रीच्या काळोखात सक्शन पंपाद्वारे बेकायदेशीररित्या हजारो ब्रास वाळू उपसा करुन वाहतुक करत असल्यामुळे शासनाच्या करोडो रुपयांच्या महसुलाचे नुकसान तसेच पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या अवैध वाळू उपशाबाबत ग्रामस्थांनी सातत्याने जिल्हाधिकारी, रत्नागिरी, तहसिलदार, संगमेश्वर यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरच्या अवैध वाळू उपशाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त नदीपात्रात अवैध उत्खनन करणाऱ्यांवर कारवाई करून अवैध वाळू उपसा बंद करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१), (२), (३) व (४) नरडुवे परिसरातील गडनदी पात्रातील वाळूच्या अवैध उत्खननाबाबत तहसिलदार, संगमेश्वर यांचेकडे भ्रमणध्वनीद्वारे त्याचबरोबर वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने दि.१३/१/२०२० व १८/१/२०२० रोजी लेखी तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी तालुकास्तरावर भरारी पथक स्थापन करण्यात आले आहे. संगमेश्वर तालुक्यात माहे एप्रिल, २०१९ ते जानेवारी, २०२० या कालावधीत वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ४ प्रकरणी दंडात्मक कार्यवाही करुन रु.१,५१,२००/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच ५ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दर्यापूर (जि.अमरावती) तालुक्यात अवैध उत्खनन होत असल्याबाबत

**(३१) * १०५६ श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दर्यापूर (जि.अमरावती) तालुक्यात मोठ्या प्रमाणात रस्त्यांची कामे सुरु असून या रस्त्याच्या कामासाठी लागणाऱ्या गौणखनिजाचे अवैधरित्या उत्खनन करून अहोरात्र वाहतूक करण्यात येत असल्याचे दिनांक १३ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अनधिकृत उत्खननामुळे खनिज संपत्तीचा ऱ्हास होत असून शासनाच्या महसुलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैध उत्खनन व वाहतुकीला प्रतिबंध घालण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) व (२) दर्यापूर तालुक्यात मोठ्या प्रमाणात रस्त्याची कामे सुरु असून तालुक्यात खनिपट्टा नसल्यामुळे रस्त्याचे कामाकरीता लागणारे गौण खनिज तालुक्याच्या बाहेरुन मंजूर खनिपट्ट्यामधून मंजूर तात्पुरत्या परवान्याद्वारे आणण्यात येत आहे. दि.१३ डिसेंबर, २०१९ वा त्या दरम्यान गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी केली असता गौण खनिज स्वामीत्वधन शुल्काचा भरणा करुन वैध पासेसचा वापर करुन वाहतूक करण्यात येत असल्याचे आढळून आले आहे.
(३) दर्यापूर तालुक्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीला प्रतिबंध घालण्यासाठी तालुकास्तरीय भरारी पथकाची स्थापना करण्यात आली असून सदर पथकामार्फत माहे एप्रिल, २०१९ ते डिसेंबर, २०१९ या कालावधीत गौण खनिजाचे अवैध वाहतूकीच्या ०७ प्रकरणी रु.१३,००,०००/- इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाशी, बेलापूर, नेरुळ व वसई येथे हॉवरक्राफ्ट सेवा सुरु करण्याबाबत

**(३२) * ५९ श्री.गणेश नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहरातील वाहतूक कोंडीची समस्या लक्षात घेवुन जलपर्यटनाला प्राधान्य देण्यासाठी वाशी, नेरुळ, बेलापूर व वसई येथे हॉवरक्राफ्ट सेवा सुरु करण्याचा निर्णय माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हॉवरक्राफ्ट सेवा सुरु करण्यासाठी सदर ठिकाणांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे काय, तसेच वाशी, बेलापूर, नेरुळ व वसई या ठिकाणी हॉवरक्राफ्टमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांकरिता कोणकोणत्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत,
(३) असल्यास, सदरहू हॉवरक्राफ्ट सेवा तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख :** (१), (२) व (३) ठाणे (मीठ बंदर जेट्टी) ते गेट वे ऑफ इंडिया (व्हाया बेलापूर सेक्टर १२ मौजे बेलपाडा जवळ) हॉवरक्राफ्ट सेवा सुरु करणे विचाराधीन आहे. याबाबतचा सर्व्हे करण्यात आला असून, सदर ठिकाणी प्रवाशांच्या सोयीसाठी प्रवासी टर्मिनल, तिकीट कार्यालय, शेड या सोयी उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

ठाणे (मीठ बंदर) व बेलापूर येथे प्रवासी टर्मिनल व तत्संबंधी सुविधा निर्माण करण्यासाठी आवश्यक असलेली जागा महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडे हस्तांतरीत करण्याबाबत संबंधित विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पंढरपुर (जि.सोलापूर) येथील प्रसिध्द कराडकर मठाचे विद्‌यमान मठाधीपती यांची झालेली हत्या

**(३३) * ७१३ श्री.वैभव नाईक (कुडाळ), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपुर (जि.सोलापूर) येथील प्रसिध्द कराडकर मठाचे विद्‌यमान मठाधीपती जयवंत पिसाळ यांची दिनांक ६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास हत्या झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या हत्येच्या संबंधात माजी मठाधिपती कराडकर हे संशयीत गुन्हेगार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बाजीरावबुवा कराडकर यांना यापुर्वी मठाच्या विश्वस्थांना मारहाण केल्या प्रकरणी शिक्षा झाली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) सदर हत्या हि दि.०७ जानेवारी, २०२० रोजी झाली आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३) या प्रकरणी कराड शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.२४७/२०१९, भा.दं.वि. कलम ३०७, ५०४,५०६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उक्त खटला न्यायप्रविष्ठ आहे.
(४) सदर प्रकरणी पंढरपूर शहर पोलीस स्टेशन येथे भाग ५ गु.र.नं.४२/२०२०, भा.दं.वि. कलम ३०२ प्रमाणे दि.०७/०१/२०२० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून, एक आरोपीला अटक करण्यात आली आहे. सध्या आरोपी न्यायालयीन कोठडीत असून गुन्हा तपासावर प्रलंबित आहे.
(५) विलंब झाला नाही.

-----------------

## आमगांव (जि.गोंदिया) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या धानाच्या पुंजणाला अज्ञात व्यक्तीने आग लावल्याबाबत

**(३४) * ३३५४ श्री.सहसराम कोरोटे (आमगाव) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आमगांव (जि.गोंदिया) तालुक्यातील ९ गावातील धान उत्पादक शेतकऱ्यांच्या धानाच्या पुंजणाला दिनांक २६ व २८ नोव्हेंबर आणि २, ५ व ७ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास अज्ञात व्यक्तीने आग लावल्यामुळे शेतकऱ्यांचे करोडो रुपयांचे नुकसान झाले असून आग लावणा-या व्यक्तींना अद्यापही अटक करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धान उत्पादक शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देऊन आग लावणा-या अज्ञात व्यक्तींवर कडक कारवाई करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १७ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधित दोषी व्यक्तींवर कारवाई करुन धान उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) सदर प्रकरणात चौकशी करण्यात आली असून चौकशीमध्ये कोणताही घातपाताचा प्रकार दिसून आला नसल्याने अकस्मात जळीत समरी तहसिलदार आमगाव यांना सादर करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गासाठी संपादीत केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत

**(३५) * २६०४ श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.महेंद्र दळवी (अलिबाग) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी महाड, पोलादपूर तालुक्यातील जवळपास ८००० शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतक-यांनी संपादित जमिनीचा मोबदला लवकरात लवकर न दिल्यास महामार्गाचे सुरु असलेले काम बंद पाडण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार उक्त महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम किती कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे तसेच शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) अंशत: खरे आहे.

सदर महामार्गाच्या रुंदीकरणासाठी महाड तालुक्यातील १२ गावे व पोलादपूर तालुक्यातील ९ गावे अशा एकूण २१ गावातील ९२३० खातेदारांच्या जमिनी संपादित करण्यात येत आहेत.

(२) नाही.

(३) होय.

९२३० खातेदारांपैकी ७३८४ खातेदारांना /सह हिस्सेदार यांना जमिनीचा मोबदला रक्कम रु.५५०.२५ कोटी वाटप करण्यात आलेला आहे. निवाड्याप्रमाणे अतिरिक्त निधी एकूण रक्कम रु.८५.११ कोटी मागणी केलेली होती. त्यापैकी रक्कम रु.४७.७२ कोटी निधी दिनांक २७/०१/२०२० रोजी उपविभागीय अधिकारी, महाड यांच्याकडे जमा झालेला आहे.त्याचे वाटप संबधितांना करण्यात येत आहे.

(४) निवाड्याप्रमाणे निधी प्राप्त झाल्यास भूसंपादनाचे काम पूर्ण होईल. रक्कम रु.४७.७२ कोटी इतका निधी प्राप्त झाला असून संबंधित शेतकऱ्यांना मोबदला वाटपाचे काम सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कळंबा (जि.कोल्हापूर) मध्यवर्ती कारागृहातील सुरक्षा व्यवस्थेबाबत

**(३६) * ३५३१ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंबा (जि.कोल्हापूर) मध्यवर्ती कारागृहामध्ये मागील ४ ते ५ वर्षापासून मोबाईल, गांजासह अन्य अंमली पदार्थ कैदयांना उपलब्ध होत असल्यामुळे कारागृहातील कमकुवत सुरक्षा व्यवस्थेप्रकरणी संशयीत अधिकारी व कर्मचारी यांचेवरील चौकशीचा अहवाल पुर्ण झाला असून सदर अहवाल अप्पर पोलिस महासंचालक कार्यालयाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अहवालाच्या अनुषंगाने शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) व (२) कोल्हापूर मध्यवर्ती कारागृहात दि.०८.०९.२०१६ रोजी सापडलेल्या मोबाईलबाबत संबंधित कर्मचारी यांना तात्काळ निलंबित करण्यात आले होते.सदर कर्मचारी यांना दि.०६.०५.२०१९ रोजी पुर्नस्थापीत केले आहे. दि.०२.०१.२०१९ रोजी त्यांची विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.दि.०३.०५.२०१७ रोजी कारागृहात गांजा सदृश्य पाला, मोबाईल व नशेच्या गोळया सापडल्याने संबंधीत कर्मचारी यांना दि.२४.०१.२०२० रोजी सक्तीने सेवानिवृत्त करण्यात आले आहे.

कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह येथील बंदयाची चित्रफित माध्यमामध्ये प्रसारीत झाल्याने संबंधीत कर्मचारी यांना दि.३१.१२.२०१८ रोजी निलंबित करण्यात आले होते.तद्दनंतर त्यांना दि.०८.०८.२०१९ रोजी पुर्नस्थापीत करुन दि.२७.८.२०१९ रोजीच्या आदेशान्वये शिक्षा प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच कारागृहातील बंदयाना विशेष वागणूक दिल्याप्रकरणी संबंधीत अधिकारी यांची चौकशी करण्यात येत आहे.

कारागृह सुरक्षा विषयक उपाययोजना करण्यात आल्या असून कारागृहात सी.सी.टी.व्ही यंत्रणा आणि मोबाईल जॅमर बसवण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात मत्स्यदुष्काळ जाहीर करण्याबाबत

**(३७) * ९८० श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.भास्कर जाधव (गुहागर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश पाटील (बोईसर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मत्स्य दुष्काळ सदृष्य परिस्थिती निर्माण झाली असुन मुंबई, पालघर, ठाणे, रायगड, सिंधुदूर्ग, रत्नागिरी या जिल्हयांत माहे ऑगस्ट ते नोव्हेंबर, २०१९ या कालावधीत झालेल्या सततच्या अतिवृष्टी, क्यार, चक्रीवादळामुळे उच्च प्रतीच्या मासळीचे प्रमाण कमी झाले असताना मागील वर्षाच्या तुलनेत मत्स्य उत्पादनात घट झाल्यामुळे मच्छिमारांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समुद्रामध्ये बेकायदेशीरपणे परराज्यातील हायस्पिड ट्रॉलर्स व एलइडी पर्ससीनच्या विध्वसंक मासेमारीमुळे पारंपारिक मासेमारांना पुरेसे मासे मिळत नसुन आधुनिक तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे जलप्रदुषणात वाढ होवुन बेसुमार मासेमारीमुळे माशांच्या प्रजाती नामशेष होत असल्याने मासळीच्या प्रमाणात घट होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई व रायगड येथील सागरी किना-याच्या परिसरातील माशांच्या १२५ जातीपैकी ७८ जाती शिल्लक असून आधुनिक तंत्रज्ञानाने मासेमारी केल्यास माशांच्या प्रजाती नष्ट होत असल्याचे सेंट्रल इन्स्टिटट्यूट ऑफ फिशरीज एज्युकेशन संस्थेने संशोधनात नमुद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नैसर्गिक आपत्तीमध्ये ज्याप्रमाणे शेतकऱ्यांना आर्थिक मदत केली जाते त्याचप्रमाणे मच्छिमारांचे सर्वेक्षण करुन नौकाधारकांना प्रत्येकी एक लाख रुपये, नौकेवर काम करणाऱ्या खलाशांना २५ हजार रुपये व मासळी विकणाऱ्या व सुकविणाऱ्या महिलांना प्रति व्यक्ती १५ हजार रुपये आर्थिक मदत देण्यात येवुन राज्यात मत्स्य दुष्काळ जाहीर करण्यात यावा अशी मागणी महाराष्ट्र राज्य मच्छिमार संघ व मच्छिमार कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मत्स्य आयुक्त यांना निवेदन देऊन केली असल्याचे दिनांक ४ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने मत्स्य दुष्काळ जाहीर करुन नुकसानग्रस्त मच्छिमार बांधवांना आर्थिक सहाय्य देण्यासह सागरी किनाऱ्याच्या परिसरातील नामशेष होत असलेल्या माशांच्या प्रजाती नष्ट होवू नये याबाबत उपाययोजना करुन बेकायदेशीर मासेमारी व्यवसायाला आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख :** (१) हे अशंत: खरे आहे.

सन २०१८-१९ मधील ऑगस्ट ते नोव्हेंबर या चार महिन्यांची मत्स्यउत्पादनाची आकडेवारी पाहता, ऑगस्ट व सप्टेंबर या महिन्यामध्ये अशंत: मत्स्यउत्पादनात घट झाल्याचे निदर्शनास येत आहे.

(२) हे खरे नाही.

शासन अधिसूचना २७/४/२०१८ अन्वये एलईडी मासेमारीस प्रतिबंध करण्यात आलेला आहे. तसेच शासन आदेश ०५/०२/२०१६ अन्वये पर्ससीन मासेमारीचे नियमन करण्यात आलेले असून शाश्वत मासेमारी टिकून राहण्याबाबत कारवाई करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे आहे.

क्यार व महा चक्रीवादळामुळे तसेच अतिवष्टीमुळे मच्छिमाराचे झालेल्या आर्थिक नुकसानाबाबत केलेल्या पंचनाम्यानुसार रु.५.०१ कोटीचा प्रस्ताव मान्यतेसाठी मदत व पुनर्वसन विभागास सादर करण्यात आलेला आहे.

(५) मागील ५ वर्षातील सागरी मत्स्यउत्पादन स्थिर असल्यामुळे मत्स्य दुष्काळ जाहिर करणे उचित होणार नाही. शासन अधिसुचना २७/४/२०१८ अन्वये एलईडी मासेमारीस प्रतिबंध करण्यात आलेला आहे. तसेच शासन आदेश ०५/०२/२०१६ अन्वये पर्ससीन मासेमारीचे नियमन करण्यात आलेले असून शाश्वत मासेमारी टिकून राहण्याबाबत कारवाई केली जात आहे. दि.३१.१०.२०१९ पर्यंत अवैध मासेमारी करणाऱ्या १०७० नौकांवर कारवाई करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्हा सहकारी दूध संघावरील आर्थिक संकटाबाबत

**(३८) * ९५ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हा सहकारी दूध संघाला सन २०१४ मध्ये ५ मेट्रीक टन क्षमतेचा भुकटी प्रकल्प मंजूर झाला असून या प्रकल्पाला सुमारे ११ कोटी २० लाख २५ हजार ९९७ रुपयांचा खर्च झाल्यामुळे सुमारे ७ कोटी ८२ लाख ४४ हजार ६६ रुपयांचा अतिरिक्त खर्च व बँकेला व्याजापोटी देणे असलेली रक्कम दूध संघाला स्वनिधीतून खर्च करावी लागली असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दूध भुकटी प्रकल्पावर जास्त खर्च झाल्यामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांचे सन २०१६-१७ मधील प्राथमिक दूध उत्पादक संस्थांचे आठ चुकारे

थकीत असुन माहे डिसेंबर, २०१७ पर्यंतचे तीन चुकारे शिल्लक असताना शासनाने दूधाचे दर वाढविल्याने ते दर शेतकऱ्यांना देण्यास दूध संघाला बांधील करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गाय व म्हशीचे दूध खरेदी फरकामुळे दूध संघाला सुमारे ६ कोटी ८३ लाख ४० हजार ९४५ रुपयांचा तोटा सहन करावा लागला असल्याने संघाचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्याअनुषंगाने दूध संघावरील कर्जाचे आर्थिक संकट दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार** : (१) शासनाने दिनांक २९ ऑक्टोबर, २०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये, भंडारा जिल्हा सहकारी दूध संघाचा ५ मे.टन क्षमतेचा प्रकल्प प्रस्ताव राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत मंजूर केला होता. सदर प्रकल्पाची किंमत रु.६.९३ कोटी इतकी होती. यामध्ये २५% संघ हिस्सा व ७५% अनुदान असा सहभाग होता.

सदर प्रकल्प मंजूर करताना मंजूर केलेल्या प्रकल्प किंमतीपेक्षा जास्तीचा होणारा खर्च संघाने स्वत: करणे आवश्यक असून त्यासाठी शासनामार्फत अतिरिक्त निधी मंजूर करण्यात येणार नाही असे शासन निर्णयात नमूद करण्यात आले होते.

मात्र, भंडारा दूध संघाने ५ मे.टन ऐवजी ७.५ मे.टन क्षमतेचा दूध भुकटी प्रकल्प तयार केल्याने वाढीव क्षमतेकरिता संघाचा रु.७,८२,४४,०६६/- इतका अधिकचा खर्च झाला असून, सदर खर्च हा संघानेच सोसावयाचा होता.

(२) दि.१-५-२०१६ ते ३१-७-२०१६ या कालावधीतील दूध उत्पादकांचे ८ हप्त्यांचे रु.६.५३ कोटी इतकी रक्कम थकित होती असे भंडारा जिल्हा दूध उत्पादक संघाने शासनास निवेदनाद्वारे कळविले आहे.

शासनाने दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताकरिता दिनांक १०/७/२०१५ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ७९ अ अन्वये निदेश निर्गमित करुन सर्व सहकारी दूध संघांना शासनाचे दूध खरेदी दर बंधनकारक केले आहेत. त्यानुसार भंडारा जिल्हा सहकारी दूध संघांनेही दूध उत्पादकांना सदर दर देणे बंधनकारक आहे.

(३) दिनांक १६.१२.२०१९ रोजीच्या पत्रान्वये भंडारा जिल्हा दूध उत्पादक संघाने असे निवेदन मा.विधानसभा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य तसेच प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, नागपूर यांना दिले आहे, हे खरे आहे.
(४) जिल्हा विशेष लेखा परीक्षक, भंडारा यांनी भंडारा जिल्हा दूध संघाचे चाचणी लेखा परीक्षण केले असता, सदर संघास रु.१३,४२,३९,२६४/- इतका तोटा झाला असल्याचे लेखा परीक्षणात नमूद केले आहे.

भंडारा जिल्हा दूध उत्पादक संघास वरीलप्रमाणे झालेला तोटा भरुन निघावा त्यासाठी केंद्र पुरस्कृत नॅशनल प्रोग्राम फॉर डेअरी डेव्हलपमेंट (NPDD) या कार्यक्रमांतर्गत संघांचे पुनर्वसन या घटकाखाली रु.१७.७३ कोटी रक्कमेचा प्रस्ताव शासनाच्या दिनांक ३१ जानेवारी, २०२० रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यातील शेतकऱ्यांना सिंचन विहिरीचा लाभ देण्याबाबत

**(३९) * ९१६ श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्याला अहिल्यादेवी सिंचन विहिर योजनेतंर्गत सुमारे २००० विहिरींचे उद्दिष्ट देण्यात आले असून या सिंचन विहिरीसाठी अनेक पात्र शेतक-यांनी सन २०१७-१८ मध्ये कागदपत्रांची पूर्तता करुनही त्यांना लाभ मिळाला नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कागदपत्रांची पूर्तता करुनही शेतकरी सिंचन विहिरी लाभापासून वंचित राहण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार सेनगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना सिंचन विहिरीचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) नाही. हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माजलगाव (जि.बीड) नगर परिषदेमध्ये झालेला गैरव्यवहार

**(४०) * ३०७९ श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माजलगाव (जि.बीड) नगर परिषदेमध्ये झालेल्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुद्ध पोलीस स्टेशन, माजलगाव (शहर) येथे फौजदारी गुन्हा क्र.३२९ दि.१४/१२/२०१९ व गुन्हा क्र.३४५ दि.२४/१२/२०१९ दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी दोषी असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी तसेच इतर आरोपींना अटक करण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१), (२) व (३) नगरपरिषद माजलगांव, जिल्हा बीड येथे विविध कामांमध्ये व अभिलेखांमध्ये फेरफार करुन अपहार केले प्रकरणी स्थापत्य अभियंता नगरपरिषद, माजलगाव यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पो.स्टे, माजलगाव येथे दि.१३.१२.२०१९ रोजी गु.र.नं. ३२९/२०१९ भा.दं.वि. कलम ४२०, ४०९, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब), ३४ प्रमाणे तसेच दिनांक २३.१२. २०१९ रोजी गु.र.नं. ३४५/२०१९ भा.दं.वि. कलम ४२०, ४०९, ४६७, ४६८, ४७१, ३४ प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सदर प्रकरणी उपलब्ध अभिलेखाची तपासणी करुन आरोपींविरुध्द ठोस पुरावे उपलब्ध करुन इतर आरोपींना अटक करण्याची कारवाई सुरु आहे .

सदर गुन्हयातील फरारी आरोपींना अटक करण्यासाठी एक पथक तयार करण्यात आले असुन गु.र.नं. ३४५/२०१९ मध्ये एका आरोपीस अटक करण्यात आलेली आहे.
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यातील प्रलंबित पाणंद रस्त्यांचे काम पुर्ण करण्याबाबत

**(४१) * १०७७ श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यातील पाणंद रस्त्यांचे शेकडो प्रस्ताव प्रलंबित असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणंद रस्ते वाहुन गेल्यामुळे शेतकऱ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सेनगाव तालुक्यातील प्रलंबित पाणंद रस्त्यांचे काम पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे आहे.

तथापि पालक मंत्री शेत/पाणंद रस्ते योजनेअंतर्गत (भाग ब) या बाबींकरता शासन निर्णय नियोजन (रोहयो) विभाग क्र. रोहयो २०१७/ प्र.क्र.२७९/ रोहयो-१०अ दि.२५ मे,२०१८ अन्वये हिंगोली जिल्हयाला रु. १.५० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने सेनगाव तालुक्यात या योजने अंतर्गत १२५ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून. त्यापैकी २८ कामे पुर्ण करण्यात आली आहेत. उर्वरीत कामांकरीता निधी वितरीत करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिखली (जि.बुलढाणा) येथील क्रीडा संकुलात क्रिडा सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४२) * १३६० श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि.बुलढाणा) शहर हे जिल्हा मुख्यालयापेक्षा लोकसंख्येने मोठे असल्याने तेथे तालुका क्रीडा संकुल असुनही क्रीडा सुविधा उपलब्ध नसल्याने खेळाडूंना सराव करता येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दर्जेदार खेळाडू निर्माण व्हावे हे शासनाचे धोरण असल्याने चिखली येथील तालुका क्रीडा संकुलास निधी उपलब्ध करून तेथे बॅडमिंटन हॉल, वोकिंग ट्रॅक, रनिंग ट्रॅक, क्रिकेट, फुटबॉलचे मैदान व इतर क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे नागपूर येथे मा.मुख्यमंत्री यांनी घेतलेल्या आढावा बैठकीदरम्यान केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चिखली येथील तालुका क्रीडा संकुलास निधी उपलब्ध करून देण्यासह इतर क्रिडा सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) याबाबतचे निवेदन प्राप्त झालेले नाही. तथापि, सदर तालुका क्रीडा संकुलाकरीता मंजूर केलेल्या निधीतुन बहुउद्देशिय हॉल, टेबल टेनीस हॉल, व्यायामशाळा, बॉस्केटबॉल कोर्ट, ४०० मी. धावनपथ, मुले- मुली प्रसाधनगृह, लॉग जम्पपीट, ओपन जीम, शुटींग व्हॉलीबॉल मैदान, जलतरण तलाव इ. क्रीडा सुविधा उपलब्ध केल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदपूर (जि.लातूर) येथील वळण रस्त्यासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत

**(४३) * ७४७ श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदपूर (जि.लातूर) येथुन जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ या वळण रस्त्यासाठी श्री.भगत यांच्या शेतातील सर्व्हे क्र.१२६ पासून ते सर्व्हे क्र.४५ पर्यंत जवळपास १८.९८ हेक्टर जमीन संपादित करुन १३४ शेतकऱ्यांना मोबदला देणे आवश्यक होते मात्र त्याबाबत अंतिम निवाडा होऊनही सदर रक्कम मिळाली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील जमिनीचे मुल्यांकन अधिक असल्याचे कारण देत महामार्ग प्राधिकरणाने हे प्रकरण लावादाकडे सादर केले असून अंतिम निवाडयातील त्रुटीमुळे सहा महिन्यांपासून हे प्रकरण प्रलंबित असल्याकारणाने वळण रस्त्यांचे काम रखडल्याने मोठया प्रमाणात अपघातही झालेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार या शेतकऱ्यांना तातडीने जमिनीचा मोबदला देऊन वळण रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत तसेच वळण रस्त्यावर अपघात होऊ नये म्हणून उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) अंशत: हे खरे आहे.

उपविभागीय अधिकारी अहमदपूर यांनी दिनांक ०९/०७/२०१८ रोजी निवाडा पारीत केलेला आहे. परंतु सदरील निवाड्यामध्ये सर्वे क्र.१२६ ते ४५ पर्यंत एकूण १४० शेतकरी असून त्यांचे एकूण १६.५२ हे.आर क्षेत्राचा निवाडा जाहिर करण्यात आला आहे. तद्नंतर सदरील निवाड्यामध्ये दिलेल्या मावेजाबाबत प्रकल्प संचालक यांनी फेरमूल्यांकनासाठी एकूण १३१ प्रकरणे माहे जून २०१९ रोजी राष्ट्रीय महामार्ग अधिनियम कलम ३ जी (५) अन्वये लवाद तथा जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे न्यायप्रविष्ठ आहेत. त्यामुळे प्रकल्प संचालक, राष्ट्रीय महामार्ग यांनी निवाड्याची रक्कम अद्याप सक्षम प्राधिकारी/उपविभागीय अधिकारी यांचेकडे जमा केलेली नाही.

(२) (अ) उक्त अधिनियमाद्वारे लवाद तथा जिल्हाधिकारी, लातूर यांचे कामकाज हे अर्ध न्यायिक स्वरूपाचे असून प्रकल्प संचालक व खाजगी मूल्यांकन करणारे अभियंते यांचे जबाब व उलट तपासणी विधीज्ञामार्फत

घेण्यात आली असून प्रकरणात दोन्ही विधिज्ञांना सुनावणीसाठी १०/०२/२०२० ही तारीख ठेवण्यात येवून तद्नंतर प्रकरणे निर्णयासाठी राखीव ठेवण्यात आली आहेत.

(ब) प्रकल्प संचालक यांच्या अहवालानुसार सद्यस्थितीत राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ हा अहमदपूर शहरातून जात असून त्यावरील वाहतूक ही पूर्वी प्रमाणेच नियमित मार्गाने सुरळीत चालू आहे.

(३) १३१ प्रकरणात सुनावणी नंतर अंतिम निर्णय पारित करण्यात येत आहे.

(४) (अ) १३१ प्रकरणात सुनावणी नंतर अंतिम निर्णय पारित करण्यात येत आहे.

(ब) प्रकल्प संचालक यांच्या अहवालानुसार सद्यस्थितीत राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ हा अहमदपूर शहरातून जात असून त्यावरील वाहतूक ही पूर्वी प्रमाणे नियमित मार्गाने सुरळीत चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मैत्रेय प्लॉटर्स ॲड स्ट्रक्चर प्रा.लि. वसई व सुवर्णसिद्धी प्रा.लि. बेंगलोर (कर्नाटक) या कंपन्यांनी नागरिकांची केलेली आर्थिक फसवणूक

**(४४) * ६२१ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ठाणे, पुणे, नाशिक, अमरावती, कोल्हापूर व सांगली जिल्हयातील "मैत्रेय सर्व्हिसेस प्रा.लि. या उद्योग समूहाच्या संचालिका वर्षा सत्पालकर यांनी सन १९९८ मध्ये वा त्यादरम्यान १२% जादा व्याजाचे व मुदत ठेव योजनेचे आमिष दाखवुन ग्राहकांचा सुमारे २८०० कोटी रुपयांनी फसवणूक केल्याचे माहे डिसेंबर-जानेवारी मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००९ पासुन गुंतवणूकदारांना पैसे देण्यास टाळाटाळ करुन दिनांक २२ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास कंपनीची कार्यालये बंद झाल्याने मजूर, भाजी विक्रेते, रिक्षाचालक इत्यादी श्रमजीवी कामगारांचे सुमारे ४२ हजार गुंतवणूकदारांनी त्यांचेविरुध्द पोलिसात तक्रार दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच भंडारा जिल्हयातील गुंतणूकदारांची मैत्रेय उद्योग समूहातील मैत्रेय प्लॉटर्स अॅड स्ट्रक्चर प्रा.लि. वसई व सुवर्णसिद्धी प्रा.लि. बेंगलोर (कर्नाटक) या कंपन्यांनी १५ कोटी रुपयांनी फसवणूक केली असून फसवणूकीचे गुन्हे दाखल करूनही मुख्य आरोपीचे मूळ प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या कंपन्यांची MPID Act, १९९९ नुसार संपत्ती जप्त व लिलाव करून गुंतवणूकधारक ग्राहकांना तातडीने पैसे मिळण्याबाबत नागरिकांनी जिल्हा पोलीस अधीक्षक, भंडारा यांना दिनांक १३ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांचे पैसे तातडीने परत मिळण्यासाठी संचालिका यांची मालमत्ता जप्त करुन आजपर्यंत किती रक्कमेचे वाटप करण्यात आले आहे तसेच याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व चौकशीच्या आनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर फौजदारी प्रकरण जलदगती न्यायालयात चालविण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे काय, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर गुन्हयातील मुख्य आरोपीने नेमलेल्या एजंटामार्फत ग्राहकांना वाटप बचत व आरडीचे मुळ प्रमाणपत्र ग्राहकांकडून जप्ती पत्रकाप्रमाणे जप्त करुन घेण्यात आले आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सदर गुन्हयातील कंपनीच्या मालकीच्या एकूण ३४६ स्थावर मालमत्ता व १७ जंगम मालमत्ता जप्त करण्यात आल्या आहेत. सदर मालमत्तेच्या विल्हेवाटीकरिता सक्षम प्राधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी तथा सक्षम

प्राधिकारी (एम.पी.आय.डी.), मुंबई यांची नेमणूक करण्यात आली आहे. या प्रकरणात सर्व अधिसूचनांसंदर्भात मा.एमपीआयडी न्यायालयात शपथपत्र दाखल करण्यात आले आहे. सद्यस्थतीत प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गुहागर (जि.रत्नागिरी) तालुक्यामध्ये बुरशीजन्य रोगामुळे सुपारी पिकाचे झालेले नुकसान

**(४५) * १७४२ श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहागर (जि.रत्नागिरी) तालुक्यामध्ये माहे जुलै व ऑगस्ट, २०१९ या महिन्यात पडलेल्या मुसळधार पावसामुळे सुपारी पिकावर पडलेल्या बुरशीजन्य रोगामुळे सुपारी पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या नुकसानीचा पंचनामा करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार संबंधित बागायतदारांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील वस्त्रोद्योग प्रकल्पांनी बनावट माहितीच्या आधारे अनुदान घेतल्याबाबत

**(४६) * ३३७५ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वस्त्रोद्योग प्रकल्पांनी बनावट माहितीच्या आधारे अनुदान, व्याज व विजेचे अनुदान घेतल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यासाठी वस्त्रोद्योग विभागाच्या सहसचिवांच्या अध्यक्षतेखाली दक्षता समितीची स्थापना करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी केलेल्या चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख :** (१), (२), (३) व (४) राज्याचे नवीन वस्रोद्योग धोरणांतर्गत वस्रोद्योग प्रकल्पांना विविध अनुदाने देण्यात येतात. त्यानुसार काही बँकांनी अपात्र घटकांचे प्रस्ताव शासनास सादर केल्याचे शासनास निदर्शनास आले. सदर प्रस्तावांना अनुदान देण्यात आलेले नाही. मात्र सदर बाब विचारात घेऊन शासनाचे अनुदान वितरीत करीत असतांना हे अनुदान पात्र उद्योगांनाच दिले जावे व त्यानुसार शासनाने दिलेल्या अटी व शर्तीची वस्रोद्योग प्रकल्प पुर्तता करीत आहे किंवा कसे हे तपासण्यासाठी शासन निर्णय दि.०४/१२/२०१९ अन्वये सहसचिव /उपसचिव (वस्रोद्योग), यांच्या नियंत्रणाखाली दक्षता व नियंत्रण पथक गठीत करण्यात आले आहे. या पथकामार्फत वस्रोद्योग प्रकल्पांची तपासणी सुरू आहे.

-----------------

## भायखळा (मुंबई) येथील पोलीस उपायुक्त कार्यालयात माहिती अधिकार कार्यकर्त्याला झालेली मारहाण

**(४७) * १३३ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलीस उपायुक्त, श्री.अभिनाश कुमार यांनी भायखळा (मुंबई) येथील त्यांच्या कार्यालयात दिनांक २७ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास माहिती अधिकार कार्यकर्ते श्री.यशवंत शिंदे यांना माहितीच्या अधिकारांतर्गत अर्जाची सुनावणी सुरु असताना मारहाण केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मारहाणीमुळे श्री.शिंदे यांना तीन दिवस केईएम रुग्णालयात भरती करावे लागले असून वैद्यकीय अहवालात मारहाणीमध्ये गळा दाबल्यामुळे श्वास कोंडल्याचे तसेच मेंदूला जबर मार लागल्याचे नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी श्री.शिंदे यांचेवर तक्रार दाखल करु नये म्हणून पोलिसांकडून दबाव टाकला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून संबंधित पोलीस अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) दि. २७.१२.२०१९ रोजी श्री.यशवंत शिंदे हे प्रथम अपिलाच्या सुनावणीसाठी श्री.अभिनाश कुमार यांच्या कार्यालयात गेले असता सुनावणी दरम्यान त्यांना मारहाण झाल्याची त्यांनी तक्रार केली आहे, ही बाब खरी आहे. तथापि, त्यांना मारहाण झाल्याची बाब चौकशीमध्ये दिसून आली नाही.

(२) श्री.शिंदे हे स्वत: दिनांक २७.१२.२०१९ रोजी के.ई.एम. रुग्णालयात उपचाराकरीता गेले होते. त्यानंतर दिनांक २८.१२.२०१९ रोजी त्यांना आंतरुग्ण म्हणून रुग्णालयात दाखल करुन घेतले व दिनांक २९.१२.२०१९ रोजी डिस्चार्ज केले. या बाबतीत पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी अपर पोलीस आयुक्त, मध्य प्रादेशिक विभाग, मुंबई यांच्याकडून सखोल चौकशी करवून घेतली आहे. त्यामध्ये त्यांनी काढलेल्या तथ्यांच्या आधारावर नमूद अर्जदार यांना मारहाणीमध्ये गळा दाबल्यामुळे श्वास कोंडल्याचे तसेच मेंदूला जबर मार लागल्याच्या बाबीस सदरील चौकशीत पुष्ठी झालेली नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पांढरकवडा (जि.यवतमाळ) पंचायत समिती अंतर्गत रोजगार हमी योजनेच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(४८) * २७३५ श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा (जि.यवतमाळ) पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायतीमध्ये रोजगार हमी योजनेच्या कामात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे चौकशी समितीने केलेल्या चौकशीत स्पष्ट झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंचायत समितीमधील तत्कालीन कनिष्ठ अभियंता, सहायक लेखाधिकारी, वरिष्ठ सहायक व गटविकास अधिकारी यांना निलंबित करुन ७ ग्रामपंचायतीचे सरपंच व १२ ग्रामसेवक यांना कारणे दाखवा नोटिसा बजावल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणावर जिल्हाधिकारी यांनी तालुक्यातील रोजगार हमी योजनेच्या गैरव्यवहारातील दोषीविरुध्द फौजदारी कार्यवाही करुन त्यांच्याकडून रक्कम वसूल करण्याचे आदेश दिले असुनही सदरहू आदेशाकडे जिल्हा परिषदेच्या प्रमुखांनी दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार रोजगार हमी योजनेच्या कामात गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषीविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून दोषी कर्मचाऱ्यावर शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात आली आहे. संबंधित दोषींवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक येथील दिशा मार्केटिंग कंपनीने केलेली फसवणूक

**(४९) * १३९६ श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील दिशा मार्केटिंग नावाच्या खाजगी कंपनीने बुलढाणा जिल्हयातील ग्राहकांची २५ लाख २९ हजार रुपयांची फसवणूक केल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी बुलढाणा शहर पोलीस स्टेशनमध्ये कंपनीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसह संचालकावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीचे निष्कर्ष काय आहे,

(४) असल्यास, चौकशीनुसार या कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी दिशा मार्केटींग कंपनीचे आरोपी क्र. १) संजय दुसाने, २) मनोज पवार व इतर सर्व साथीदार यांचेविरुध्द पोलीस स्टेशन, बुलढाणा शहर येथे अप.क्र. ८४०/२०१९ कलम ४२०, ४०६, ३४ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल असुन गुन्हयाचा तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे आवरे व कडापे (ता.उरण, जि.रायगड) येथे सावकारांनी शेतकऱ्यांची जमीन विक्री करुन केलेला गैरव्यवहार

**(५०) * ९४९ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आवरे व कडापे (ता.उरण, जि.रायगड) येथील अब्दुल लतिफसह इतर ७ सावकारांनी सुमारे ४०० शेतकऱ्यांची फसवणूक करुन त्यांची ३०० एकर जमीन परस्पर रिलायन्स महामुंबई एसईझेडला विक्री करुन आर्थिक गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विशेष भूसंपादन अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांची परवानगी न घेता तसेच जमिनीचा कोणताही मोबदला न देता जमिनीची ताबे पावती रिलायन्स कंपनीच्या नावे करण्याचे आदेश दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार सदरहू जमिनीच्या कुळांची पुन्हा ७/१२ वर नोंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) व (२) हे खरे नाही.

गाव अभिलेखामधील ७/१२ उताऱ्यांनुसार प्रस्तुत जमीन मिळकती या भूसंपादन अधिनियम, १८९४ मधील कलम ११(२) अन्वये २००९ साली पारित निवाड्याप्रमाणे मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र (एसईझेड) यांच्या नावे झालेल्या आहेत. त्याबाबतची नुकसान भरपाई रक्कम जमीन मालक यांनी स्वीकारलेली आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे आवरे व कडापे ग्रामस्थ शेतकरी यांचे मा.महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई यांच्याकडील रिव्हिजन अपील व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडील रिट पिटिशन नं.२२८६४/२०१८,दिनांक ०७.०८.२०१८ रोजी दाखल केलेले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

## राज्यात अंमली पदार्थांच्या तस्करीत वाढ झाल्याबाबत

**(५१) * १८६ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी**

**पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.फारूक शाह (धुळे शहर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.राजेश पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विविध ठिकाणी अंमली पदार्थाची तस्करी होत असून तरुण पिढी या अंमली पदार्थांना बळी पडत असल्याचे तसेच मुंबई पोलिसांकडून करण्यात आलेल्या कारवाईत गांजा एमडी सारख्या अंमली पदार्थांची तस्करी वाढली असून पुणे शहरात सन २०१९ मध्ये तीन कोटींचे ड्रग्ज जप्त केल्याचे तसेच ब्राऊन शुगर या अंमली पदार्थाऐवजी कमली नावाने अंमलीपदार्थ विकले जात असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील विलेपार्ले पश्चिम रेल्वे स्थानकासमोर भररस्त्यावर अंमली पदार्थ विकले जात असून मुंबईतील मालाड रेल्वे स्थानक परिसरातून २० कोटी रुपयांच्या १० किलो हेरॉईन साठ्यासह दोघांना वांद्रे युनिटच्या ॲण्टी नार्कोटिक्स सेलच्या अधिकाऱ्यांनी दिनांक ४ जानेवारी, २०२० रोजी अटक केली आहे तसेच मुंब्रा, ठाणे येथे मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थांचा

व्यापार होत असून ५० ग्रॅम पेक्षा जास्त अंमली पदार्थ बाळगले तरच कारवाई करण्याची तरतूद कायद्यात असल्याने या विक्रेत्यांवर कारवाई करताना अडचण निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राजस्थानमधुन मुंबईत आणलेल्या १२ कोटी रुपयांच्या हेरॉइनचा साठा अंमली पदार्थाविरोधी पथकाने माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान जप्त केला असून सन २०१९ मध्ये मुंबई पोलिसांनी केलेल्या कारवाई दरम्यान अंमली पदार्थाच्या तस्करी संदर्भात एकूण ११ हजार ५७२ गुन्हे नोंदविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून मुंबईसह राज्यातील अंमली पदार्थांच्या तस्करीला प्रतिबंध घालून अंमली पदार्थ बाळगणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करण्यासाठी कायद्यात योग्य ती दुरूस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख** : (१) अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई यांनी जानेवारी २०२० मध्ये एकुण ०४ गुन्हे दाखल केले असुन एकुण ०८ आरोपी अटक केले आहेत. सदर ०४ गुन्हयात ०६ किलो हिरोईन, १६३८ कोडीन बॉटल्स, ३७ किलो गांजा, ११० ग्रॅम मेफेड्रॉन (MD) असा एकुण १२,१९,४५,२००/- रुपये किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. अंमली पदार्थ विरोधी कक्षातील अंमलदार व साध्या वेषातील गुप्त बातमीदारांमार्फत पाळत ठेवुन वेळोवेळी कारवाई करण्यात येते. नमुद कारवाईमुळे ड्रग्ज तस्करीला आळा बसलेला आहे.

(२) ५० ग्रॅम पेक्षा जास्त अंमली पदार्थ जवळ बाळगल्यास कारवाई होते हे म्हणणे खरे नाही. सांताक्रुझ पोलीस ठाणे अंतर्गत विलेपार्ले पश्चिम रेल्वे स्टेशन जवळ नियतक्षेत्र क्रमांक तीनची पोलीस बिट चौकी असुन, सदर पोलीस बिट चौकी व नानावटी शाळेजवळील परिसर यामध्ये अंदाजे अर्धा किलोमिटरचे अंतर आहे. त्यामुळे सदर परिसरात दिवसा व रात्री पर्यवेक्षक अधिकारी त्याचप्रमाणे बिट अधिकारी व अंमलदार यांच्या मार्फतीने तसेच मोबाईल व मार्शल वाहनावरील अंमलदाराकरवी गस्त घालण्यात येते. तसेच अंमली पदार्थाचे सेवन करणारे व विक्री करणाऱ्या इसमांबाबत माहिती प्राप्त

होताच त्यांचा शोध घेवुन संबंधीत इसमाविरुध्द एनडीपीएस कायद्यान्वये कायदेशीर कारवाई करण्यात येत असते.

(३) होय, अंमली पदार्थ विरोधी कक्ष बांद्रा युनिट गु.र.क्र.०१/२०२०, कलम ८ (क) सह २१(क) २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५, अन्वये रुईया चाळ, बी.एम.सी. शौचालयाच्या मागे, मालाड (प), मुंबई, येथे रु.१२,००,००,०००/- किंमतीचा, ०६ किलो हेरॉईन, आरोपी १) राजेश तुलसीदास जोशी, वय ५० वर्षे, रा.ठि. मालाड, मुंबई २) कृष्णमुर्ती मुत्तीस्वंय कवंदर, वय ४२ वर्षे, रा.ठि. गोराई मुंबई, यांच्याकडून जप्त करण्यात आला आहे.

सन २०१९ मध्ये अंमली पदार्थ विरोधी कक्ष व मुंबई पोलीसांनी एकुण ११ हजार ७०६ गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत.

(४) राज्यात अंमली पदार्थ बाळगणे व विक्री करणा-यांविरुद्ध, अंमली पदार्थ व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम, १९८५ या केंद्रीय अधिनियमांतर्गत कलमान्वये अतिशय प्रभावीपणे कारवाई होत असल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## राज्यात प्रतिबंधीत थायी मांगूर माशांची होत असलेली विक्री

**(५२) * २४६ श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साकोली (जि.भंडारा) तालुक्यात मत्स्यव्यवसाय विभाग व नगर परिषद विभागाने धाडी टाकले असता प्रतिबंधीत थायलंड मांगूर माशांची विक्री होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मुंबईसह आजुबाजुच्या परिसरात थायी मांगूर मासा मानवी आरोग्यास व पर्यावरणास घातक असुनही हया माशांची विक्री होत असल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या माशांच्या निर्मितीवर शासनाने निर्बंध घातले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने थायी मांगूर माशांची निर्मिती करणाऱ्या मस्य व्यवसायकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख :** (१) होय हे खरे आहे.
(२) थायी मांगूर मासा मानवी आरोग्यास व पर्यावरणास घातक आहे. मुंबईसह आजुबाजुच्या परिसरात दिनांक ११ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास या माशाची विक्री होत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(३) मा. राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली यांनी दि. २२.०१.२०१९ रोजीच्या आदेशान्वये थायी मांगूर माशांच्या प्रजनन, संवर्धन, विक्री व वाहतुकीवर बंदी घातलेली आहे.
(४) अ) भंडारा जिल्हयातील पवनी तालुक्यात दि.२३.१२.२०१९ रोजी व साकोली तालुक्यात दि.०७.०१.२०२० रोजी बाजारपेठेमध्ये विक्री होत असलेला थायी मांगूर माशांचा साठा जप्त करुन नष्ट करण्यात आलेला आहे.

ब) भंडारा जिल्हयातील अर्जुनी-मोरगांव येथे दि. ३०.०१.२०२० रोजी संयुक्त छापा मारुन संवर्धन होत असलेला थायी मांगूर माशांचा साठा नष्ट करण्यात आला आहे.

क) रायगड जिल्हयातील महड व हाळ गावांतील थायी मांगूर मासे संवर्धकांवर सत्र न्यायालयात खटला दाखल केला आहे.

ड) ठाणे जिल्हयातील भिवंडी तालुक्यातील मौजे साईगाव येथे १५,००० किलो थायी मांगूर माशांचा साठा नष्ट करुन संबंधीत मत्स्य संवर्धकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मांडवा ते भाऊचा धक्का या जलमार्गावर रो-रो बोट सेवा सुरु करण्याबाबत

**(५३) * ७९३ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अथांग समुद्राचा आनंद घेतानाच जलदगतीने प्रवास व्हावा यासाठी मांडवा ते भाऊचा धक्का या जलमार्गावर रो-रो बोट सेवा सुरु करण्याचा शासनाने निर्णय घेतल्यानंतर आजमितीस ३ वर्षाचा कालावधी उलटला तरीही रो-रो बोट सेवा सुरु झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेरी टाईम बोर्डाने गाळ उपसण्याचे कंत्राट देवुन सुमारे २५ कोटी खर्च केले असताना गाळ उपशाच्या नावाखाली ठेकेदारांचा फायदा करणा-या मेरी टाईम बोर्डामुळे रो-रो सेवा अद्यापपर्यंत सुरु झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वारंवार उपसल्या जाणाऱ्या गाळावर होणारा करोडो रुपयांचा खर्च लक्षात घेऊन अलिबागचे सामाजिक कार्यकर्ते यांनी गृह विभागाकडे लेखी तक्रार केल्यामुळे गाळ उपशाची चौकशी सुरु करुन कंत्राटदारांची देयके थांबविण्यात आली असतानाही पुन्हा गाळ काढण्याची निविदा प्रसिध्द केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मांडवा ते भाऊचा धक्का यादरम्यान रो-रो बोट सेवा तात्काळ सुरु करण्याबाबत व संबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) गाळ काढण्याची निविदा पुन्हा प्रसिध्द केली आहे. याबाबतची चौकशी प्रगतीत आहे.

(५) नवीन भाऊचा धक्का ते मांडवा या जलमार्गावर रो-रो फेरीबोट सेवा चालविण्यासाठी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत नियुक्त करण्यात आलेल्या

ऑपरेटरने ग्रीस या देशातून खरेदी केलेले जहाज २० फेब्रुवारी २०२० पर्यन्त मुंबई येथे पोहोचणे अपेक्षित आहे. त्यानंतर, हे जहाज भारतीय समुद्री क्षेत्रात चालविण्यासाठी संबंधित कायदेशीर तरतूदींची पूर्तता करणे, नियोजित जलमार्गावर जहाज चालविण्याचे प्रात्याक्षिक घेणे इत्यादी बाबी पूर्ण करण्यात येतील व त्यानंतर ही रो-रो सेवा सुरु करण्यात येईल.

प्रस्तावित रो-रो फेरीबोट सेवा सुरक्षित व सुरळीत चालविणे शक्य होण्यासाठी पावसाळी हंगामामध्ये नौकानयन मार्गात साचलेला गाळ उपसणे अत्यंत गरजेचे असल्यामुळे गाळ उपसणीच्या कामासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली व त्यानुसार हे काम करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यातील नदी पात्रात अवैध वाळू उपसा होत असल्याबाबत

**(५४) * १०७९ श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यातील नदी पात्रातुन वाळू माफियांमार्फत मोठ्या प्रमाणात वाळू उपसा करण्यात येत असल्याचे तसेच साभलखेडा फाट्यानजीक तथा खंडाळा-भांडेगाव मार्गावरील माळावर माळ जमीन खोदून मोठ्या प्रमाणात मुरुम उत्खनन होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तालुक्यातील घाटांचा लिलाव झाला नसून सदरच्या अवैध वाळू उपाशामुळे शासनाच्या लाखो रुपयांच्या महसूलाचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून या तालुक्यात अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१), (२) व (३) सेनगाव तालुक्यातील पूर्णा, वैनगंगा व कयाधू नदीपात्रातील एकूण १७ वाळूघाटांचे तालुकास्तरीय तांत्रिक समितीमार्फत सर्वेक्षणाचे काम प्रगतीपथावर असून खाणकाम आराखडा, पर्यावरण अनुमती इ.बाबी पूर्ण झाल्यानंतर लिलावाची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

सेनगाव तालुक्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीला प्रतिबंध घालण्यासाठी तालुकास्तरीय भरारी पथकाची स्थापना करण्यात आली असून सदर पथकामार्फत माहे एप्रिल,२०१९ ते डिसेंबर,२०१९ या कालावधीत गौण खनिजाचे अवैध वाहतूकीच्या ०७ प्रकरणी रु.१३,१६,०००/- इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच ६ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात अनेक शेतकरी रब्बी पिक विम्यापासुन वंचित असल्याबाबत

**(५५) * ७६२ श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रब्बी पिकविमा उतरविण्याची मुदत दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ अखेर संपुष्टात आल्यामुळे राज्यातील लातूर, हिंगोली, बीड, वाशीम, रत्नागिरी, गडचिरोली, सिंधुदुर्ग, भंडारा आणि सोलापूर या ९ जिल्हयातील शेतक-यांना रब्बी पिकविमा भरता आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रधानमंत्री पिक विमा योजना लागू करण्यासाठी शासन निर्णय निर्गमित केलेला असतानाही तब्बल ९ वेळा निविदा काढूनही निविदा भरण्यास खाजगी व सरकारी विमा कंपन्यांनी भाग घेतला नसल्यामुळे शेतकरी पिक विम्यापासुन वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रब्बी पिकांची ३४ लाख हेक्टरवर पेरणी झालेली असून सदरहू ९ जिल्हयांमध्ये रब्बी हंगामाची पेरणी जवळपास १८ ते २० लाख हेक्टरवर

झाली, तसेच मागील वर्षी रब्बी हंगामासाठी शेतक-यांनी सुमारे ८५० कोटी रुपयांचा विमा हप्ता भरला असुन त्यातील शेतक-यांचा वाटा सुमारे ११५ कोटीचा असुन उर्वरित रक्कम शासनाने भरली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू जिल्हयातील शेतकऱ्यांच्या रब्बी पिक विम्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) अंशतः खरे आहे.

राज्यात सन २०१९-२० रब्बी हंगामात ५७.६४ लाख हे. क्षेत्रावर पेरणी झाली असून निविदा न आलेल्या १० जिल्हयांमध्ये रब्बी हंगामात १६.७४ लाख हे. क्षेत्रावर पेरणी झाली आहे.

प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत रब्बी हंगाम २०१८-१९ मध्ये एकूण ४८.४३ लाख शेतकरी अर्जदारांनी एकूण शेतकरी विमा हप्ता रक्कम रु.१२४.१६ कोटी, राज्य व केंद्र हिस्सा रू.७६३.७४ कोटी असा एकूण विमा हप्ता रक्कम रु.८८७.८९ कोटी अदा करुन ३०.३७ लाख हे. क्षेत्र विमा संरक्षित केले आहे. त्यापैकी एकूण ३०.९३ लाख पात्र शेतकरी अर्जदारांना रक्कम रु. ९५२.५७ कोटी नुकसान भरपाई पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आले आहे.
(४) मा.मंत्री (कृषि) यांचे अध्यक्षतेखाली दि.३०/०१/२०२० शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेली मंत्रिमंडळ उपसमिती ज्या जिल्हयात विमा कंपनीची नेमणूक होऊ शकली नाही तिथे यासंदर्भात व्यावहारीक धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी उपाययोजना सूचविणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे येथील गुडविन ज्वेलर्सने गुंतवणूकदारांची केलेली फसवणूक

**(५६) * १९१ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), अॅड.आशिष**

**शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहर आणि मुंबई परिसरात गुंतवणूकीवर जादा व्याजाचे तसेच सोन्याचे दागिने देण्याचे प्रलोभन दाखवून १८० हून अधिक गुंतवणूकदारांची सुमारे साडेतीन कोटींची फसवणूक करुन ठाणे येथील गुडविन ज्वेलर्सचे व्यवस्थापकीय संचालक सुनीलकुमार अकराकरण व इतर ५ लोक पळून गेल्याची घटना घडल्याचे माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नौपाडा पोलीस ठाण्यात गुडविन ज्वेलर्सच्या विरुध्द माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान पहिला गुन्हा दाखल झाल्यानंतर माहे ऑक्टोबर, २०१९ च्या शेवटच्या आठवडयात एकूण ९२ गुंतवणूकदारांनी व आतापर्यंत १६५ गुंतवणूकदारांनी विविध पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल केले असून आतापर्यंत ३ कोटी ८ लाखांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित गुन्हेगाराविरोधात कारवाई करून गुंतवणूकदारांचे पैसे परत मिळवण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) व (२) होय हे खरे आहे.

(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी राज्यात विविध पोलीस ठाण्यांमध्ये १२ गुन्हे दाखल असून भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, ४०९, ३४ सह महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ अन्वये कलम ३, ४ तसेच, दि. बॅनिंग ऑफ अनरेग्युलेटरी डिपॉझिट स्किम्स ॲक्ट च्या कलम ३,४,५ अन्वये कलमे लावण्यात आलेली आहेत.

सदर गुन्ह्यात एकूण २ मुख्य आरोपींना अटक करण्यात आली आहे.

केरळ, तामिळनाडु व महाराष्ट्र येथील आरोपींच्या ३८ स्थावर मालमत्ता व ७ जंगम मालमत्ता संरक्षित करण्यात आली असून ७ बँक खाती गोठविण्यात आली आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिखली (जि.बुलढाणा) येथे 'वन नेशन वन रेशन कार्ड' या प्रकल्पांतर्गत नागरिकांची झालेली फसवणूक

**(५७) * १४०० श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि.बुलढाणा) येथे 'वन नेशन वन रेशन कार्ड' या प्रकल्पांतर्गत जनकल्याण इकॉनॉमिक डेव्हलपमेंट निधी या नावाने सदस्यत्व देऊन नागरिकांची फसवणूक करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी स्थानिक पोलिस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून आतापर्यंत किती दोषींना अटक करण्यात आली आहे तसेच त्यांच्यावर कोणत्या कलमान्वये कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणासंदर्भात पोलीस स्टेशन चिखली, जि.बुलढाणा येथे दि.०३/०१/२०२० रोजी निरीक्षण अधिकारी, तहसिल चिखली यांच्या फिर्यादीवरुन आरोपी राजेश जानकिराम वाहुरवाघ याचे विरुध्द अप. क्र. ०५/२०२० कलम ४२०, ४६५, ४७०, ४७१ भा.द.वि. प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

गुन्हयाचा तपास प्रभारी अधिकारी पो. स्टे. चिखली हे करीत असून आरोपीस दिनांक २८/०१/२०२० रोजी अटक करण्यात आली आहे.
(४) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील आरे वसाहतीमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे मत्स्यालय उभारण्याबाबत

**(५८) * ९५५ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील आरे वसाहतीमधील ११४ एकर भूखंडावर बँकॉक येथील सिॲम ओशन वर्ल्डच्या धर्तीवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे मत्स्यालय उभारण्याची आकर्षक योजना राबविण्याचा शासनाने दिनांक १० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मत्स्यालयास एकूण किती निधी खर्च होणे अपेक्षित असुन मत्स्यालय उभारण्याचे काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, सदरहू आंतरराष्ट्रीय दर्जाचे मत्स्यालय उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख :** (१), (२), (३) व (४) मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली पर्यटन विभागाच्या झालेल्या आढावा बैठकीत मा.मुख्यमंत्री महोदयांनी आरे वसाहतीमध्ये बँकॉक येथील सिॲम ओशन वर्ल्डच्या धर्तीवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे मत्स्यालय उभे करण्याबाबत सुचना दिल्या आहेत.

मात्र अद्यापि याबाबत पर्यटन विभागाकडून पुढील सुचना निर्गमित करण्यात आलेली नाही. या विषयीचा प्रस्ताव प्राप्त झाल्यावर दुग्धव्यवसाय विकास विभागाकडून आरे कॉलनीची जागा उपलब्ध करण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल. तसेच पर्यटन विभागाने मत्स्यव्यवसाय विभागास सदर प्रकल्पाचे अंमलबजावणीचे कार्य सोपविल्यास त्याविषयी आवश्यक सर्व कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## राज्यात बालकांवरील लैंगिक अत्याचारामध्ये झालेली वाढ

**(५९) * ३१९ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.रावसाहेब अंतापूरकर (देगलूर), श्री.चंद्रकांत निंबा पाटील (मुक्ताईनगर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एनसीआरबीच्या आकडेवारीनुसार राज्यात बालकांचे लैंगिक शोषण करण्याच्या एकूण २८३२ घटना घडल्या असून दरदिवशी हिंसाचाराच्या सरासरी ५१ घटनांची नोंद होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बालकांचे लैंगिक शोषण, लैंगिक अत्याचार आणि अश्लील साहित्य छायाचित्रासाठी बालकांचा वापर करणे तसेच बालकांची अश्लील साहित्य छायाचित्रे संग्रहीत करण्याच्या घटनांमध्येही वाढ होत असुन सदर गुंन्हयापासून बालकांचे रक्षण करण्यासाठी निर्माण केलेल्या पोस्को कायद्यातही सदर घटनांच्या नोंदी करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून बालकांचे लैंगिक शोषण तातडीने थांबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) होय, खरे आहे.

(२) होय, खरे आहे.

(३) बालकांचे लैंगिक शोषण थांबविण्यासाठी शासनाने केलेल्या उपाययोजना पुढीलप्रमाणे आहेत :-

i) बालकांवरील अत्याचारास प्रतिबंध करण्यासाठी महिला व बाल अपराध प्रतिबंधक विभागाची स्थापना करण्यात आली असून विशेष पोलीस महानिरीक्षक हे विभागाचे प्रमुख आहेत.

ii) Criminal Law Amendment No.२ of २०१८ नुसार बलात्कारांच्या गुन्ह्यांच्या शिक्षेत केलेली वाढ व तपासाबाबतच्या नवीन सुधारणांबाबतच्या सूचना दि.०९/०७/२०१८ रोजीच्या परीपत्रकाद्वारे देण्यात आलेल्या आहेत.

iii) बालकांविरूध्दच्या गुन्ह्यांचा तपासासंदर्भात केंद्रीय गृह मंत्रालयाकडून प्राप्त मार्गदर्शिका सर्व पोलीस घटकांना पाठविण्यात आली आहे.

iv) बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम-२०१२ ची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता सर्व पोलीस घटकांच्या कार्यशाळा आयोजित करण्यात येतात.

v) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम-२०१२ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी 'विशेष कृती दल' (Special Task Force) गठीत करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

vi) संकटात सापडलेल्या बालकांसाठी १०९८ ही टोल फ्री हेल्पलाईन कार्यान्वित करण्यात आली आहे.

vii) राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये एक पोलीस अधिकारी हा बालकल्याण अधिकारी म्हणून नेमण्यात आलेला आहे.

viii) सर्व पोलीस घटकांमध्ये विशेष बाल पोलीस पथके स्थापन करण्यात आली आहेत.

ix) ऑनलाईन बाल लैंगिक गैरवर्तन साहित्य रोखण्यासाठीच्या उपायांबाबत केंद्र शासनाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत सर्व पोलीस घटकांना सूचित करण्यात आले आहे.

x) बालकांविरूध्दच्या गुन्ह्यांच्यावेळी राष्ट्रीय बाल संरक्षण आयोगाने पाठविलेली कार्यपध्दती (Standard Operating Procedure) अवलंबण्याबाबत सर्व पोलीस घटकांना सूचित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# राज्यातील शहीद जवानांच्या कुटुंबियांना अनुदानाची वाढीव रक्कम पूर्वलक्षी प्रभावाने देण्याबाबत

**(६०) * २४८ श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम) :** सन्माननीय **माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास भारतीय लष्कराच्या शसस्त्र सेना ध्वज दिनानिमित्त नागपूर येथील कार्यक्रमात शहीद जवानांच्या कुटुंबियांना देण्यात येणाऱ्या एकरकमी अनुदानात रुपये ८.५० लक्ष वरून २५ लक्ष रुपये वाढ केल्याचे जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार त्याबाबतचा शासन निर्णय क्र. मसैम-२०१८ (प्र ३१०) २०१७/१८, दिनांक २७ मार्च, २०१८ पूर्वलक्षी प्रभावाने दिनांक ०१ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास लागू करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.मुख्यमंत्री महोदयांची घोषणा व सदर शासन निर्णय लागू करण्याचा १० दिवसांचा कालावधी या दरम्यान महाराष्ट्रातील शहीद झालेल्या जवानांच्या कुटुंबियांना वाढीव एकरकमी अनुदानाचा लाभ मिळत नसल्याने त्यामध्ये सुधारणा करण्यात यावी याबाबत विरपिता निवेदक यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक २९ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) तत्कालीन मा. मंत्री, माजी सैनिक कल्याण, महाराष्ट्र राज्य यांनी दि. २१/१२/२०१७ रोजी नागपूर येथे झालेल्या ध्वजदिन निधी संकलन कार्यक्रमामध्ये शहीद जवानांच्या कुटुंबियांना देण्यात येत असलेल्या अनुदानाची रक्कम रू. ५.०० लाख वरून रू. २५.०० लाख करण्यात येत असल्याचे जाहीर केले होते.

(२) होय.

(३) शहीद मेजर प्रफुल्ल अंबादास मोहरकर यांचे वडीलांनी उपरोक्त शासन निर्णय दि. ०१/०४/२०१७ च्या पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्याची विनंती केली होती.

(४) पूर्वलक्षी प्रभावाने सदर वाढीव तरतूद लागू करण्याची विनंती अमान्य करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तळेखोल (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) परिसरात गोवा राज्यातील खाण कंपन्या अनधिकृतरित्या उत्खनन करत असल्याबाबत

**(६१) * ७९६ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळेखोल (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) परिसरात मागील काही वर्षापासून गोवा राज्यातील खाण कंपन्या अनधिकृतरित्या कोट्यवधी रुपयांच्या दगडाचे उत्खनन करून गोवा राज्यात वाहतूक करत असून सदरहू अनधिकृत दगड उत्खननाविरोधात शासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उत्खननामुळे प्रदूषण वाढणे, रस्यांची दुरावस्था होणे,पाणी साठे नष्ट होणे, वन्य प्राण्यांचा जीव जाणे तसेच जनतेचे आरोग्य धोक्यात येणे इत्यादी समस्या निर्माण होत असल्याने ग्रामस्थांना काही वर्षापासून सातत्याने तहसिलदार, दोडामार्ग, जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग, मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग, खनिकर्म अधिकारी, सिंधुदुर्ग यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे तक्रारी करून सदर अवैध उत्खनन बंद करण्याबाबत मागणी केली असून त्यासाठी दिनांक ९ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास तहसिलदार कार्यालयासमोर ग्रामस्थ, सरपंच व महिलांसह आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मागणीकडे महसूल प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून सदरहू अनधिकृत दगड उत्खनन बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) अशी बाब दृष्टोत्पत्तीस आली नाही.
(२), (३) व (४) मौजे तळेखोल हद्दीमधील खडीक्रशर व काळा दगड खाणी ८ दिवसात बंद न केल्यास दि.१९/१२/२०१९ रोजीपासून तळेखोल ग्रामस्थ उपोषणास बसतील अशा आशयाचे निवेदन मौजे तळेखोल ग्रामस्थांनी दि.१३/१२/२०१९ रोजी तहसीलदार, सिंधुदूर्ग यांना दिले होते. त्यानुषंगाने अपर जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांच्या दि.२४/१२/२०१९ रोजीच्या आदेशान्वये मौजे तळेखोल, ता.दोडामार्ग येथील सर्व्हे नं.३३८/१ब, क्षेत्र ०.८०.००० हे.आर. हा खाणपट्टा पुढील आदेशापर्यंत उत्खनन व वाहतूकीस बंद करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेंद्र भागवत**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.